म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ११६५३
१५५६

# आर्थिक साम्राज्यवाद

REFBK-0009286

किंमत : ७५ नये पैसे

# आर्थिक साम्राज्यवाद

Economic Imperialism :
A lesson in Eastern Europe
या पुस्तकाचा सरळ अनुवाद.


आल्फ्रेड झॉबरमन

अनुवादक
प्रा. चि. त्र्यं. येवलेकर
एम्. ए.


REFBK-0009286


वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स प्रायव्हेट लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता मुंबई २.

Copy-Rights Reserved by
Ampersand Ltd., London.

▼

पहिली आवृत्ति
डिसेंबर १९५७

▼

किंमत :
७५ नये पैसे

▼

प्रकाशक :
एस्. के. वोरा,
वोरा अॅन्ड कं. पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

▼

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर,
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनवार पेठ,
पुणें २.

# प्रास्ताविक

पूर्व आणि पश्चिम युरोपांतील जे प्रदेश आज रशियाच्या अंकित राष्ट्रांत जमा आहेत, त्या भूमीवर विजयी रशियन सेनांचें पहिलें पदार्पण झाल्याला आतां दहाहून अधिक वर्षें लोटलीं. या कालांत सोव्हिएट सत्तेचे या प्रदेशांतील आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनावर कोणकोणते परिणाम झाले याचें संपूर्ण विश्लेषण अद्याप शक्य नसलें तरी रशियानें तेथील जीवनांत खोलवर बदल प्रयत्नपूर्वक घडवून आणले आहेत, हें निश्चितपणें सिद्ध करण्याइतका पुरावा आजही उपलब्ध आहे.

प्रस्तुत पुस्तकांत सोव्हिएट संघराज्य आणि अंकित प्रदेश यांमधील परस्पर आर्थिक संबंधांचें स्वरूप स्थूलमानानें प्रकट व्हावें या हेतूनें हातीं असलेल्या पुराव्यांची मांडणी व छाननी केलेली आहे. कित्येक गोष्टीबद्दलचें विवेचन त्रोटक व तुटक वाटलें तर त्याचें कारण आवश्यक त्या आंकडेवारीचा अभाव हेंच. जवळ असलेल्या अपुऱ्या माहितीवरून कांहीं सामान्य निष्कर्ष काढणें कांहीं ठिकाणीं अपरिहार्य झालें असलें तरी त्यांचें प्रमाण योग्य मर्यादेंत राखण्याचा कटाक्षानें प्रयत्न केला आहे.

गेल्या दशकांतील घटना अत्यंत विपुल आणि गुंतागुंतीच्या आहेत. त्या सर्वांचाच येथें परामर्ष घेणें कठीण असल्यामुळें त्यांपैकीं परस्परांतील आर्थिक संबंधांच्या वाढींतील महत्त्वाचे टप्पे दर्शविणाऱ्या ठळक घटनांचीच निवड प्रस्तुत विवेचनाच्या सोयीसाठीं केलेली आहे. अशा घटना म्हणजे ‘ट्रूमन तत्त्वाची घोषणा व मार्शल योजना’, ‘कोरियन युद्ध’ आणि ‘स्टालीनचा मृत्यु’ या होत.

या घटनांच्या चौकटींत प्रस्तुत निवेदनाची आंखणी केलेली आहे.

अनुक्रमणिका


- घृणास्पद लूटमार ५
- संक्रमण २०
- अप्रत्यक्ष लूट २८

मध्य व पूर्व युरोपांतील राष्ट्रांत आज आढळून येणारी विशिष्ट राजकीय परिस्थिति ही युद्धोत्तर कालांतील निरनिराळ्या कारणांचा परिपाक आहे. परंतु सोव्हिएट रशियाचें लष्करी सामर्थ्य हें त्यांतील सर्वांत महत्त्वाचें कारण. ज्या क्षणीं या भागांतील प्रदेशांवर रशियन सेनांचा पहिला हल्ला झाला, त्या क्षणापासून तेथील निरनिराळ्या राष्ट्रीय सरकारांचीं सूत्रें स्थानिक कम्युनिस्ट पक्षाचे हातांत गेलेलीं आहेत. केवळ प्रथम कांहीं दिवसच सर्व सत्ता आपले हातीं केंद्रित करण्याचा मोह कम्युनिस्ट पक्षांनीं टाळला होता. प्रारंभींचा काल हा संयुक्त आघाड्यांचा काल होता. 'राष्ट्रीय आघाडी', 'फॅसिस्टविरोधी आघाडी', 'लोकशाहीवादी प्रागतिक आघाडी' अशा निरनिराळ्या नांवाखालीं शेतकरी, कामगार, ख्रिश्चन समाजवादी आणि मध्यमवर्गीय अशा प्रकारच्या गटांना एकत्र आणून त्यांचें संमिश्र सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न त्या कालांत केला जात असे. मध्ययुरोपांत आणि विशेषत: झेकोस्लोव्हाकियांत हे प्रयोग बाल्कनमधील प्रयोगाचे मानानें अधिक विशुद्धपणें चालू होते.

◆◆ ◆◆ ◆◆ ◆◆

राजकीय क्षेत्रांतील संमिश्रव्यवस्थेच्या कल्पनेची दाट छाया आर्थिक क्षेत्रावरही पडल्याचें दिसून येतें.

बहुतेक देशांत राष्ट्रीयीकरणाचा अवलंब महत्त्वाच्या सर्व क्षेत्रांत करण्यांत आल्यामुळें तेथील अर्थव्यवस्थेचीं सूत्रें आपोआपच सरकारचे हातांत गेलीं होतीं. सरकारी भांडवलशाही हा जनताप्रधान लोकशाहीचाच आर्थिक पर्याय होय असा प्रचार प्रथम प्रथम या भागांत करण्यांत येत असे. परंतु कालान्तरानें या कल्पनेला खो देण्यांत आला.

त्यानंतर अंकित प्रदेशांत आपला पाय पक्का रोवला जावा यासाठीं त्या प्रदेशांबाबत एक सूत्रबद्ध व निश्चित धोरण आंखण्याचा निर्णय सोव्हिएट सरकारनें घेतला. सोव्हिएटच्या या नवीन धोरणाचा उगम तीन

प्रकारच्या प्रेरणांतून झाल्याचें दिसून येतें. त्यांपैकीं पहिली प्रेरणा जर्मन प्रतिशोधाबद्दल रशियाचे मनांत वारंवार डांचणारी भीति ही होय. दुसरी प्रेरणा महायुद्धामुळें रशियाची झालेली आर्थिक हानी भरून काढण्याच्या कल्पनेंतून उत्पन्न झाली होती. त्या दृष्टीनें मध्य व पूर्व युरोपांतील इतर गरीब राष्ट्रांपेक्षां जर्मनींतूनच संपत्तीचा प्रचंड ओघ रशियाकडे वळविण्याचा प्रयत्न करणें इष्ट आहे असें सोव्हिएट सरकारचें मत होतें.

तिसरी प्रेरणा एका वेगळ्याच आशावादांतून निर्माण झाली होती. रशियांत बोल्शेव्हिक पक्षाचा विजय होऊन सत्ता-क्रान्ती घडून आली. त्या वेळीं पहिलें महायुद्ध नुकतेंच संपलें होतें. युरोपिअन राष्ट्रांतील परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. तेथील जनतेंत असंतोषाची लाट पसरलेली होती. या परिस्थितीचा फायदा घेऊन साम्यवादी क्रान्तीचें लोण सर्व युरोपभर सहजपणें पसरवितां येईल अशा विश्वासानें तें कार्य बोल्शेव्हिक पक्षानें लेनिनच्या नेतृत्वाखालीं हातीं घेतलें होतें. परंतु १९२० सालीं वॉर्साच्या वेशीवर रशियाचा प्रचंड पराभव होऊन बोल्शेव्हिक क्रान्तीची लाट तेथेंच थोपविली गेली होती. पहिल्या महायुद्धानें युरोपिअन जनतेच्या मनांत पेटवून दिलेली क्रान्तिकारक विचारांची आगही त्यानंतर झपाट्यानें विझून गेली होती आणि लेलिननें हातीं घेतलेलें कार्य अपुरें राहिलें होतें. तें कार्य पूर्ण करण्याची संधि दुसऱ्या महायुद्धामुळें रशियास पुन्हां प्राप्त झाली आहे आणि जें लेनिनला साधतां आलें नाहीं तें स्टालीनला साध्य होण्याजोगी परिस्थिती युरोपभर उत्पन्न झाली आहे असा विश्वास रशियन नेत्यांना वाटूं लागला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या खाईंत भाजून निघालेल्या देशोदेशींच्या जनतेच्या मनांत धुमसणारा असंतोषाचा अग्नि प्रचाराची फुंकर घालून प्रज्वलित करावा आणि ती जनता क्रान्तिप्रवण आणि रशियानुकूल करून घ्यावी असा त्यांचा मानस होता. असें केल्यास रशियाचें आर्थिक व लष्करी सामर्थ्य वाढीस लागून लवकरच जागतिक राष्ट्रमालिकेंत त्याला अमेरिकेच्या बरोबरीचें स्थान प्राप्त होईल आणि या वाढत्या सामर्थ्यांतूनच पुढें पाश्चात्य भांडवलशाहीचें युरोपांतून संपूर्ण उच्चाटन करणें आपणांस शक्य होईल, असा भरंवसा रशियन नेत्यांना वाटूं लागला होता.

'झटपट श्रीमंती' प्राप्त करून घेण्याच्या रशियन धोरणास बळी पडलेल्या राष्ट्रसमूहांत कांहीं रशियाचीं शत्रुराष्ट्रें होतीं तशींच कांहीं त्याचीं मित्रराष्ट्रेंही होती. प्रत्येक राष्ट्राच्या प्रतिष्ठेनुसार आणि तेथील सोव्हिएट सैनिकांच्या प्रमाणानुसार त्या त्या राष्ट्राला मिळणाऱ्या वागणुकीच्या तपशीलांत कांहीं फरक पडत असे एवढेंच.

अंकित प्रदेशांची पिळवणूक घडवून आणण्याचे रशियाचे अनेक मार्ग होते. त्यांपैकीं कांहीं अगदीं खोलवर जाणारे व संपूर्ण शोषण करणारे होते. एका मार्गाची आंखणी व्याप्त प्रदेशांतील सोव्हिएट सैन्याचा खर्च परस्पर भागविला जाण्याचे दृष्टीनें करण्यांत आली होती. पूर्वींच्या कणा (ॲक्सिस) राष्ट्रांपैकीं ज्याला सर्वांत सौम्य प्रकारची वागणूक मिळाली त्या बल्गेरियाशीं युद्धबंदी-करार करतांना, त्या देशांतील आपलें कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठीं, सोव्हिएट सेनाधिकाऱ्यांना ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता लागेल त्या त्या सर्व गोष्टी त्यांना पुरविण्याचें बंधन बल्गेरियन सरकारवर लादण्यांत आलें होतें.

रुमानियावरील बंधनेंही अशींच जाचक होती. त्या देशांतील जळण आणि अन्नाचा सर्व सांठा सोव्हिएट सैन्याचे ताब्यांत देण्याची सक्ती तेथील सरकारवर करण्यांत आली होती. त्याशिवाय सोव्हिएट सैन्यास लागणारीं सर्व प्रकारचीं प्रवाससाधनें व औद्योगिक सामुग्री पुरविण्याची जबाबदारीही त्यांचेवर टाकण्यांत आली होती.

हंगेरीची अवस्थाही यापेक्षां बिलकुल वेगळी नव्हती. रशियन सेनांचा पांढरा हत्ती पोसतांना तेथील जनतेची जी ससेहोलपट झाली त्याचें हृदयद्रावक चित्रण ( माजी ) हंगेरियन पंतप्रधान फेरेन्स नागी यांनीं केलें आहे. हंगेरीवर पडलेल्या बोजाचा पैशांत हिशोब केल्यास, तो प्रतिवर्षी ५०० ते ६०० दशलक्ष फोरिन्ट्स किंवा ५० दशलक्ष डॉलर्सच्या घरांत जात असल्याचें दिसून येतें.

---

1. Ference Nagy–The struggle behind the Iron Curtain. (New York, 1948, P. 104)

बल्गेरिया, रुमानिया व हंगेरी या देशांशीं शांतता-करार झाल्यानंतरही रशिया व ऑस्ट्रिया यांमधील दळणवळणाचे मार्ग त्या प्रदेशांतून जात असल्याचें निमित्त पुढें करून त्या मार्गांच्या सुरक्षिततेसाठीं रशियानें आपल्या सेना तेथें ठेवल्याच होता. पोलंडमधील आपल्या लष्करी अस्तित्वाचें समर्थनही सोव्हिएट सरकार याच प्रकारें करीत असे. जर्मनीशीं रशियाचे संबंध अबाधित राखण्यासाठीं पोलंडमधून जाणारे दळणवळणाचे मार्ग सुरक्षित ठेवण्याचें कार्य या सेना करीत आहेत असें त्याबद्दल सोव्हिएट सरकारचें समर्थन असे. पश्चिम पोलंडमध्यें राहणाऱ्या सोव्हिएट सैनिकांच्या उपजीविकेसाठी कित्येक शेतजमिनी मूळ मालकांकडून हिरावून घेऊन सैनिकांचे ताब्यांत कसण्यासाठीं देण्यांत आल्या होत्या.

पूर्व व मध्य युरोपांतील देशांची अपरिमित हानि कशानें झाली असेल तर त्या देशांतील कारखान्यांची रशियानें केलेली मोडतोड व यंत्रसामुग्रीचें स्वतःच्या देशांत स्थलांतर यामुळें होय. पूर्वीच्या दोस्त राष्ट्रांशीं संबंध राखतांना देखील सोव्हिएट सरकार आंतरराष्ट्रीय विधिनियमांची वाटेल तशी ओढाताण करण्यास मागेंपुढें पाहात नव्हते. पोट्सडॅम करार होण्यापूर्वीं रशियानें अशा प्रकारें सुमारें ५० दशलक्ष डॉलर्स किंमतीची सामुग्री पश्चिमी प्रदेशांतून उचलून नेली असावी असा अंदाज श्री. बेरूट यांनीं व्यक्तविला आहे.* ही रक्कम पश्चिमी राष्ट्रांनी अनरा (U. N. R. R. A.) या संस्थेमार्फत पोलंडला साहाय्य म्हणून दिलेल्या रकमेपेक्षां फारशी कमी नाहीं.

## नुकसानभरपाई

युद्धामुळें झालेल्या नुकसानीबद्दल मिळावयाच्या भरपाईचा आंकडा निश्चित करण्यांत आला. त्यांत सोव्हिएट संघराज्याच्या वांट्यास ५०० दशलक्ष डॉलर्सची रक्कम आली होती. या रकमेपैकीं दोनपंचमांश भाग रशियास रुमानियाकडून मिळावयाचा होता आणि उरलेला हंगेरीकडून वसूल केला जावयाचा होता. परंतु नुकसानभरपाईचे निमित्तानें रशियानें या

* Rzelzper polia Aug. 24-1945.

देशांकडून ज्या वस्तू मिळविल्या त्यांची किंमत प्रत्यक्षांत वरील रकमेपेक्षां बरीच अधिक होती. कारण युद्धपूर्वकालांतील खालच्या पातळीवरील किंमती प्रमाण मानून आपल्या देण्याचे हिशोब करण्याचा आग्रह रशियानें या देशांवर लादला होता. त्याशिवाय या वस्तूंच्या त्यावेळच्या किंमती स्थूलमानानेंच निश्चित करण्यांत आल्या होत्या. तसें करतांनाही आपल्या पदरांत झुकतें माप पडावें अशी दक्षता रशियानें घेतलीच होती.

नुकसानभरपाईची रक्कम आणि ती देण्याची पद्धत ठरवितांना त्या त्या देशांतील मोक्याच्या धंद्यांतील उत्पादन रशियाकडे गहाण रहावें, या गोष्टीवर सोव्हिएट सरकारचा विशेष कटाक्ष असे. उदाहरणार्थ, नुकसान-भरपाईच्या सहा वर्षांच्या कालावधींत सोव्हिएट संघराज्यास या प्रदेशांतून प्रतिवर्षी १७ लक्ष टन पेट्रोलियमचा पुरवठा होत होता. ( या पेट्रोलि-अमची किंमत टनास १५ डॉलर, म्हणजे पेट्रोलियमच्या तत्कालीन जागतिक किंमतीच्या साधारण निम्म्याइतकी ठरविण्यांत आली होती. )

युद्ध संपण्याचे सुमारास पोलंडमधील खाणींचा कारभार चालविण्या-साठीं रशिया व पोलंड यांनीं मिळून एक संयुक्त खाण काम-कंपनी स्थापन करावी अशी सूचना सोव्हिएट सरकारनें पोलंडला केली होती. या व्यवहारांत सोव्हिएट रशियानें पोलंडमधील कोळशाच्या खाणी जर्मनीचे ताब्यांतून मुक्त करण्याची हमी दिली होती. पोलिश सरकारांतील अनेक सदस्यांचा या रशियन सूचनेस कसून विरोध होता. म्हणून रशियानें आपली सूचना मागें घेऊन त्या ऐवजी पोलंडनें रशियन खर्चाची परतफेड म्हणून द्यावयाच्या वस्तूंत कोळशाचा समावेश करावा असा करार त्या देशांशीं केला होता. मिकोलाझिकचे मतें या करारानुसार रशियास मिळणाऱ्या कोळशाची किंमत टनास १·२५ डॉलर इतकी ठरविण्यांत आली होती. इतरत्र उपलब्ध असलेल्या पुराव्यांवरूनही मिकोलाझिकचे विधानास पुष्टि मिळते. याचा अर्थ पोलंडमधून रशियाला मिळणाच्या कोळशाची किंमत, त्याच्या जागतिक किंमतीच्या केवळ एकदशांशाइतकी होती असें सिद्ध होतें.

आंतरराष्ट्रीय विधिनियमांचा विशिष्ट पद्धतीनें अर्थ लावून त्यांची आपल्या स्वार्थासाठीं राबवणूक करण्याचें रशियाचें कौशल्य जर्मन

मालमत्तेच्या प्रश्नाचा अभ्यास करतांना विशेषत्वानें दिसून येतें. १९४८ पूर्वी जर्मनीच्या मालकीची बाहेरदेशीं असलेली सर्व मालमत्ता मग-ती झेकोस्लोव्हाकियाखेरीज अन्य कोणत्याही अंकित प्रदेशांत असो–ताब्यांत घेण्याचा अधिकार पोट्सडॅम करारान्वयें रशियास मिळाला होता. या कराराचा दूरान्वयानें अर्थ लावून निरनिराळ्या देशांत जर्मन मालकीच्या ज्या खाजगी कंपन्या होत्या त्यांपैकीं कांहींची संपूर्ण मालकी तर कांहींच्या कारभारांत भागिदारी मिळविण्याचा प्रयत्न रशियन सरकारनें यशस्वीपणें केला. इतकेंच नव्हे तर युद्धपूर्वकालांत दोस्तराष्ट्रांच्या मालकीचे असलेले परंतु युद्धकालांत जर्मनीनें त्यांचेकडून हिरावून घेतलेले हंगेरीमधील अनेक औद्योगिक कारखाने आपल्या कक्षेंत आणण्याचा प्रयत्न रशियानें केला. या कृत्यांचा कायदेशीरपणा सिद्ध करण्यासाठीं पोट्सडॅम कराराचाच आधार घेण्यांत आला होता. या प्रयत्नाचें उत्तम उदाहरण म्हणजे हंगेरियन स्टँडर्ड ऑईल कंपनी. रशियानें या प्रयत्नांचें क्षेत्र रुमानियांतही विस्तारलें होतें. रेझिटा येथील पोलाद-कारखान्याच्या शेअर भांडवलापैकीं निम्मा भाग एका ज्यू कुटुंबाच्या मालकीचा होता. युद्धकालांत जर्मनांनीं तो भाग आपल्या ताब्यांत घेतला होता. युद्ध संपल्यानंतर रुमानियाचा प्रदेश आणि तेथील मालमत्ता रशियन प्रभुत्वाखालीं आली. त्यावेळीं मूळ ज्यू कुटुंबाच्या मालकी हक्कांबद्दल कोणत्याही तऱ्हेची भीडमुर्वत न बाळगतां रेझिटा कारखान्याचें भांडवल रशियानें आपल्या ताब्यांत घेतलें.

युद्धोत्तर नुकसानभरपाईचा इतिहास लिहितांना त्यांत 'अंकित देशांनीं जर्मनीकडून घेतलेल्या कर्जाचा प्रश्न' या विषयासाठीं एक स्वतंत्र प्रकरणच राखून ठेवलें पाहिजे. या संदर्भांत हंगेरींतील अवजड उद्योगधंद्यांचे क्षेत्रांत विशेष महत्त्व पावलेल्या ' मॅनफ्रेड वुइस ' ( Manfred Weiss ) या कंपनीच्या मालकीच्या एका प्रचंड कारखान्याचें उदाहरण अगदीं नमुनेदार आणि रशियन धोरणावर प्रखर प्रकाश टाकणारें आहे. युद्धकालांत जर्मनीनें आपल्या हवाई दलाच्या सिद्धतेसाठीं वरील कारखान्याचें विमानबांधणीचें कारखान्यांत रूपांतर केलें होतें. त्यासाठीं फील्ड मार्शल गोअरिंगच्या आज्ञेनें हंगेरीयन कंपनीस जर्मन सरकारकडून ६०० दशलक्ष मार्क्सचें कर्ज मिळालें होतें.

अनुक्रम २५५५४८ कि: निबंध ११
क्रमांक ९९६३ नों दि:

हंगेरीवर रशियन विमानांनीं केलेल्या बॉम्बफेकींत या कारखान्याचा कांहीं भाग उध्वस्त झाला होता. त्यानंतर कांहीं दिवसांनीं उरलेला कारखाना मोडून टाकून त्यांतील यंत्रसामुग्री जर्मनीस रवाना झाली होती. अशी या कारखान्याची हकीगत होती. तथापि युद्धानंतर वेळ येतांच, सोव्हिएट सरकार वरील ६०० दशलक्ष मार्क्सच्या रकमेवर आपला हक्क सांगू लागलें. या रकमेची डॉलर्समधील किंमत त्या वेळच्या अधिकृत हुंडणावळीचे दरानुसार २०० दशलक्ष डॉलर्स इतकी होती.' * या प्रश्नावर बरीचशी घासाघीस होऊन अखेर रशियाचें म्हणणें मान्य करण्यांत आलें होतें.

अशा प्रकारच्या पिळवणुकीच्या कृत्यांपासून सोव्हिएट संघराज्यास एकूण किती लाभ झाला याचा पैशांत आढावा घेण्याचा प्रयत्न आम्ही येथें करणार नाहीं. तथापि एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं या पिळवणुकीमुळें सोव्हिएट संघराज्याच्या जें कांहीं पदरांत पडलें, त्या मानानें पिळवणुकीला बळी पडलेल्या देशांचें झालेलें नुकसान फार मोठें होतें.

जुलै १९४६ पर्यंतच्या कालांत युद्धखर्चाची फेड म्हणून रुमानियानें जवळ जवळ १०० कोटी डॉलर्सची भरपाई केलेली होती. याच्या जोडीस १९४७ ऑगस्टपर्यंत सोव्हिएट सैन्य पोसण्यासाठीं रुमानियानें पुरविलेली रक्कम जमेस धरल्यास एकूण खर्चाचा हिशोब २०० कोटी डॉलर्सच्या घरांत जातो. ही रक्कम साधारणपणें त्या देशाच्या एकूण वार्षिक उत्पन्नाइतकी होते.

या कालावधींत रुमानियाच्या औद्योगिक उत्पादनक्षमतेंत घट होऊन ती युद्धपूर्वकालीन उत्पादनक्षमतेच्या केवळ ३० टक्के इतकी खालीं आली होती. सोव्हिएट संघराज्याच्या हितासाठीं रुमानियांतील उद्योगधंदे जास्तींत जास्त प्रमाणांत कार्यशील करण्याचा प्रयत्न होऊनही त्यांचें एकूण उत्पादन युद्धपूर्वकालीन उत्पादनाच्या निम्म्यापेक्षांही कमीच होतें.

हंगेरियन सरकारच्या हिशोबानुसार याच कालखंडांत त्यांच्या देशाच्या औद्योगिक उत्पादनापैकीं ६० ते ७० टक्के भाग परतफेडीचे कारणीं खर्च

---

* Nicholus Nyardi–My Ringside Seat in Moscow. ( New York 1952 P. P. 49–50. )

होत होता. कोळसा, धातुकाम, इंजिनिअरिंग यासारख्या कांहीं महत्वाच्या उद्योगधंद्यांबाबत हें प्रमाण याहूनही अधिक असून तें ८० ते ९५ टक्क्यापर्यंत गेलेलें असावें असा अंदाज निरनिराळ्या अभ्यासकांनीं व्यक्त केला आहे. पॅरिस शांतता परिषदेसाठीं गेलेल्या अमेरिकन शिष्टमंडळानें सोव्हिएट संघराज्यास द्यावी लागणारी भरपाई, त्यांच्या पुरवाव्या लागणाऱ्या अन्य मागण्या आणि त्यांनीं व्यापलेला प्रदेश यामुळें हंगेरीस सोसाव्या लागणाऱ्या खर्चाचा अंदाज घेतला, तेव्हां तो खर्च देशाच्या वार्षिक उत्पन्नाच्या ३५टक्यां-इतका असल्याचें त्यांना आढळून आलें. ब्रिटिश पार्लमेंटच्या शिष्टमंडळानेंही अशाच प्रकारची मोजणी केली तेव्हां त्यांच्या व अमेरिकन शिष्टमंडळाच्या हिशोबांत फारशी तफावत नसल्याचें आढळून आलें.

रुमानिया आणि हंगेरी यांचा परतफेडीचे पायीं होणारा खर्च मुळांत फार मोठा होताच; तरीही तो जर्मनीकडून उकळण्यांत येणाऱ्या जब्र रकमांच्या मानानें कमीच होता. तथापि येथें जर्मन परतफेडीचा अभ्यास करतांना, पोलंडच्या पिळवणुकीचे संदर्भापुरताच विचार आपण करणार आहोंत.

इ.स. १९४५च्या पोट्सडॅम परिषदेंत असें ठरलें होतें कीं, जर्मनीकडून पोलंडचे वतीनें सोव्हिएट रशियानें नुकसानभरपाई वसूल करावी आणि वसूल रकमेंतील १५ टक्के भाग पोलंडला देऊन त्या देशाची मागणी रशियानें पूर्ण करावी. वरील मुदतींत जर्मनीकडून सुमारें ४०० ते ४५० कोटी डॉलर्स किमतीचा माल परतफेडीचे रूपानें आपल्याला मिळाल्याचें सोव्हिएट सरकारनें प्रकट केलेलें आहे. हा हिशोब करतांना प्राप्त वस्तूंच्या १९३६ सालांतील किमती प्रमाण मानण्यांत आल्या होत्या. १९४७ सालांतील वाढलेल्या किमती ध्यानांत घेऊन हिशोब केल्यास रशियाला मिळालेल्या मालाची एकूण किमत ९०० कोटी डॉलर्सच्या जवळपास जाते. परंतु मॉस्को येथें इ. स. १९४७ मध्यें भरलेल्या परराष्ट्रमंत्र्यांच्या परिषदेंत सोव्हिएट सरकारची या अवधींतील प्राप्ती वस्तुत: १४०० कोटी डॉलर्सच्या घरांत गेली असल्याचा अंदाज सूचित केला होता. पश्चिम जर्मनीनें केलेल्या हिशोबानुसारही इ. स. १९५३ अखेर रशियाच्या पदरांत पडलेल्या मालाची किमत वरील रकमेच्या दुपटीपेक्षां कमी नसल्याचें आढळून आलें होतें.

या बाबतींत अगदीं सोव्हिएट सरकारचे आंकडे मान्य करावयाचे म्हटले तरी पोलंडचे विश्वस्त या नात्यानें वसूल केलेल्या रकमेंतून रशियाला पोलंडचें १०० ते १५० कोटी डॉलर्स देणें आहे हें उघड आहे. वस्तुतः हें देणें याच्या जवळ जवळ दुप्पट आहे. युद्धसमाप्तीनंतरच्या पहिल्या दोन तीन वर्षांत रशियाच्या सांगण्यावरून जर्मनीनें पोलंडला यंत्रसामुग्रीचा जो पुरवठा केला त्याला भरपूर प्रसिद्धी देण्यांत आली होती. तथापि त्या यंत्र-सामुग्रीची किंमत १० कोटी डॉलर्सपेक्षां अधिक नव्हती. आणि त्यानंतर रशियानें पोलंडचें देणें दिल्याबद्दल पुन्हां केव्हांही कांहींही ऐकिवांत आलेलें नाहीं.

सोव्हिएट संघराज्यानें विजेता म्हणून नुकसानभरपाईसाठीं आपला हक्क प्रस्थापित करण्यांत जी उत्सुकता दाखविली तीच त्यांची उत्सुकता पिळवणुकीच्या आणखी एका अत्यंत कल्पक मार्गाचा अवलंब करण्यांतही दिसून आली. आपल्या प्रभुत्वाखालील देशांत आपलीं आर्थिक केंद्रें निर्माण करणें हा तो मार्ग होय.

या प्रकारच्या पिळवणुकीचें उत्तम उदाहरण म्हणजे दुसऱ्या देशांत स्थापन केलेली सोव्हिएट मालकीची कंपनी हें होय. अशा प्रकारची कंपनी हें सोव्हिएट सरकारचें अन्य प्रदेशांतील एक आर्थिक सत्ताकेंद्रच असतें. इ. स. १९४६ च्या अखेर पूर्वजर्मनींतील एकूण पंचवीस टक्के औद्योगिक उत्पादन एस. ए. जी. (Sowjetirche Aktien Gesellehaften) या रशियन कंपनीकडूनच होत होतें. त्यांत लोखंड व पोलाद आणि मोटार गाड्या व लॉऱ्या यांचें संपूर्ण उत्पादन, अचूक काम देणाऱ्या महत्त्वाच्या यंत्रोत्पादनाचा ३/५ भाग, पोटॅशिअमयुक्त खतांच्या उत्पादनाचा अर्धा हिस्सा इत्यादि महत्त्वाच्या बाबींचा समावेश होता. पूर्वजर्मनीव्यतिरिक्त इतरत्र सोव्हिएट संघराज्याला आपलीं पावलें इतक्या उघडपणें रोंवतां आलीं नव्हतीं. हंगेरींत थोड्या प्रमाणांत त्यांचीं आर्थिक सत्ताकेंद्रें प्रस्थापित झालीं होतीं. परंतु अन्य अंकित प्रदेशांतील उद्योगधंद्यांत त्यांचा हस्तक्षेप वेगळ्या मिषानें आणि बुरख्याआडून होत होता. अशा तऱ्हेनें हस्तक्षेप

करण्याचें सोव्हिएट सरकारचें अत्यंत प्रिय साधन म्हणजे इतर देशांबरोबर संयुक्त जबाबदारीचे तत्त्वावर कंपनी स्थापन करणें हें होय. (अशा कंपन्यांचा व्याप केवळ अंकित प्रदेशांपुरताच मर्यादित नसे.) इ. स. १९४७ च्या मार्च-पर्यंत सोव्हिएट सरकार पूर्वीच्या शत्रुराष्ट्रांप्रमाणेंच मित्रराष्ट्रांबरोबर व्यवहार करतांनाही या साधनाचा अवलंब करीत असे. परंतु त्या सुमारास अशा प्रकारचें वर्तन मित्रराष्ट्रांबाबत योग्य नसल्याचें स्टालीनला मान्य झालें होतें.

निरनिराळ्या अंकित देशांतील खाणकामाचे धंदे साधारणत: संयुक्त कंपनीचे ताब्यांत असत. रुमानियांतील तेलाच्या खाणी आणि हंगेरींतील बॉक्साइटच्या खाणी उदाहरणादाखल सांगतां येतील. त्याशिवाय रस्ते, नद्या आणि हवाई मार्ग यावरील वाहतुक, कच्च्या मालाचें इष्ट रूपांतर करणारे कारखाने आणि इंजिनीअरिंग धंद्यांतील कांहीं महत्त्वाचे विभाग इत्यादि व्यवसायही संयुक्त कंपन्यांचे क्षेत्रांत मोडत असत.

सामान्यत: अशा संयुक्त कंपन्या भांडवल, नफातोटा आणि व्यवस्था याबाबत पन्नास-पन्नास टक्के जबाबदारीच्या व अधिकाराच्या तत्त्वावर उभारल्या जातात.

पोलंडमधील खाणकामाच्या संयुक्त कंपनीची काय अवस्था झाली तें आपण पाहिलेलेंच आहे. मार्शल टीटो सोव्हिएट गटांतून फुटून निघाल्यानंतर ज्या गोष्टी उजेडांत आल्या, त्यावरून आणखी एका मित्र-राष्ट्राबरोबर संयुक्त कंपनीच्या द्वारें कार्य करतांना भांडवलाच्या उभारणी-बाबत रशियाचे व्यवहार कसे होते याची स्पष्ट कल्पना आपणांस येते. उदाहरणार्थ 'जुस्पाद' (Juspad) या सोव्हिएट-युगोस्लाव्य संयुक्त जलवाहतुक कंपनीसाठीं युगोस्लाव्हियानें आपली डॅन्यूब नदींत वाहतुक करणारीं सर्व उत्तम जहाजें भांडवली सामुग्रींतील आपला वांटा म्हणून दिलीं होतीं. परंतु या कंपनीस एकही सोव्हिएट जहाज भांडवलरूपानें मिळालेलें नव्हतें. तसेच संयुक्त जबाबदारीनें खाणकामाची एक कंपनी स्थापन करण्याच्या वाटाघाटी चालू असतां युगोस्लाव्हियाच्या मालकीच्या खाणजमिनीची किंमत करण्याचा प्रश्न पुढें आला. त्यावेळीं

सोव्हिएट प्रतिनिधींनीं तडक मार्क्सच्या शिकवणुकीचा आधार पुढें करून तो प्रश्न निकालांत काढला. तेल किंवा अन्य खजिनें धारण करणाऱ्या जमिनींच्या किंमतीबद्दल वेगळा विचार करण्याचें कारणच नाहीं. कारण त्या निसर्गाच्या देणग्या आहेत आणि मार्क्सच्या मूल्यसिद्धान्तानुसार अशा देणग्यांत मानवी श्रम ग्रथित झालेले नसल्यामुळें त्यांना कोणतेंच सामजिक मूल्य नसतें असें सोव्हिएट प्रतिनिधींचें प्रतिपादन होतें.

पूर्वीच्या शत्रुराष्ट्रांत संयुक्त जबाबदारीनें कोणताही व्यवसाय सुरूं करतांना त्यांत सोव्हिएट सरकार जें भांडवल गुंतवीत असे त्यांत युद्धपर्वांत त्या देशांतून मिळालेली लूट, युद्धोत्तर कालांत नुकसानभरपाईचे रूपानें त्या देशांकडून मिळणारा माल आणि पोट्सडॅम करारानुसार कायदेशीरपणें जप्त केलेली त्या देशांतील सामुग्री यांचाच केवळ अंतर्भाव असे. हंगेरी आणि रुमानिया यांचीं अंतर्गत जलमार्गावर वाहतूक करणारीं जहाजें रशियानें लूट म्हणून काबीज केलीं होतीं. तीच पुढें स्थापन झालेल्या डॅन्यूब नॅव्हिगेशन संयुक्त कंपनींतील आपला भांडवली हिस्सा म्हणून सोव्हिएट सरकारनें त्या कंपनीचे हवालीं केलीं. तसेंच जर्मनींतून ताब्यांत आलेलें शेअर भांडवलच सोव्हिएट सरकारनें 'सोव्होरोम पेट्रोल कंपनी'साठीं भांडवल म्हणून वापरलें. या शेअर भांडवलांत जर्मनीनें इतर देशांचें आणि विशेषतः फ्रेंचांचें जें भांडवल कब्जांत घेतलें होतें त्याचाही समावेश होता.

वरील प्रकारच्या कंपन्यांच्या कारभाराचे संदर्भांत 'समानता' या शब्दास एक वेगळाच अर्थ प्राप्त झाला होता. अशा कंपन्यांचे नियामक मंडळावर रशियाचे व अंकित देशांचे सारखच सभासद असले तरी कंपनीचा प्रमुख व्यवस्थापक नेहमीं रशियनच असे. हे रशियन व्यवस्थापक आपल्या सत्तेचा वापर करतांना रशिया आणि अन्य देश या दोहोंत डावे-उजवेपणा कसा करीत असत याचें उत्तम उदाहरण युगोस्लाव्हियांत स्थापन झालेल्या संमिश्र नाविक वाहतुक कंपनीचे कारभारावरून मिळतें. या कंपनीचीं जहाजें वापरतांना वाहतुक-कर म्हणून सोव्हिएट संघराज्यास टनामागें ०·१९ दिनार

जकात द्यावी लागे, तर युगोस्लाव्हियासाठीं या जकातीचा दर टनामागें ०·४२ दिनार असा ठरविण्यांत आला होता.▼

एक धोरणाची बाब या दृष्टीनें संमिश्र कंपनीची कल्पना अनेक तऱ्हेनें उपयुक्त ठरलेली आहे. सोव्हिएट वर्चस्वाच्या प्रारंभींच्या कालांत या व्यवस्थेंतून पुढील गोष्टी साध्य झाल्याचें दिसतें. (अ) अल्प किंमतींत निरनिराळ्या उपयुक्त वस्तूंचा भरपूर सांठा रशियास उपलब्ध होण्याची मिळालेली हमी; (ब) संबंधित देशांत वापरण्यासाठीं रशियाचे हवालीं झालेला अमाप द्रव्यपुरवठा; (क) देशोदेशींच्या अर्थव्यवस्थेंतील मोक्याच्या क्षेत्रांत रशियास मिळालेलें प्रभुत्व; (ड) राजकीय हेतुपूर्तीसाठीं वापरतां येण्याजोग्या एका प्रभावी साधनाची प्राप्ति.

संमिश्र कंपनीची कल्पना अशा रीतीनें अत्यंत लवचिक असून ती विविध क्षेत्रांत अनुसरण्यास योग्य असल्याचें अनुभवावरून सिद्ध झालेलें आहे.

## व्यापार

दोस्तराष्ट्रांची युरोपांतील मोहीम सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांत, सोव्हिएट सरकारनें पूर्व आणि मध्य युरोपांतील देशांबरोबर मैत्रीचे आणि व्यापारी संबंधांचे तह केले. या तहांचीं बोलणीं करण्यासाठीं मॉस्कोमध्यें देशोदेशींचीं शिष्टमंडळें येत असत. त्यांचेवर सोव्हिएट सरकारचें अप्रत्यक्ष दडपण असे. कारण अशा शिष्टमंडळांतील सदस्य प्रायः त्या त्या देशांतील कम्युनिस्ट सरकारांचे प्रतिनिधीच असत. या गोष्टी सोव्हिएट संघराज्यास तहाचीं कलमें निश्चित करतांना विलक्षण लाभदायक ठरत. सोव्हिएट संघराज्यांतून निर्यात होणारा धान्यपुरवठा हें रशियाचें सर्वांत मोठें राजकीय भांडवल असे. आपलें पोषण केवळ आपल्या सामर्थ्यशाली मित्रराष्ट्रामुळेंच घडत आहे ही भावना छोट्या राष्ट्रांचे मनांत रुजवून त्यायोगें त्या राष्ट्रांवरील आपली पकड घट्ट करण्याचे कामीं रशियास या धान्यनिर्यातीचा हवा तसा उपयोग करून घेतां येत असे. आणि रशियन सरकार,

▼ Vladimar Dedijer, Tito Speaks, (London 1953, Page 293.)

तसेंच देशोदेशींच्या कम्युनिस्ट पक्षसंघटना तसा तो पुरेपूर करून घेण्याचे बाबतींत अत्यंत दक्ष असत. रशियांतून बाहेरदेशीं जाणाऱ्या या प्रचंड धान्य-साठ्यांपैकीं एक दाणादेखील मदतीचे अथवा देणगीचे रूपानें रवाना होत नसे. या धान्याचे मोबदल्यांत रशियाकडून ज्या वस्तूंची मागणी केली जाई त्या वस्तूंना डॉलर व स्टर्लिंग प्रदेशांतील राष्ट्रांतूनही भरपूर मागणी असे. परंतु अशा वस्तू व्यापारी तहान्वयें प्रथम रशियाचे पदरांत टाकाव्या लागल्यामुळें डॉलर व स्टर्लिंग चलनाबाबत त्या देशांना नेहमीं मोठी झळ सोसावी लागे. ( उदाहरणार्थ, युगोस्लोव्हाकियांतून रशियाला मिळालेले लोखंडाव्यतिरिक्त धातू,तसेंच झेकोस्लोव्हाकियांतून मिळणारी यंत्रसामुग्री.)

रशियन व्यापारांतील आयात-निर्यात वस्तूंच्या अटी रशियाचे भागीदारास नेहेमींच प्रतिकूल आणि नुकसानकारक असत. अमेरिकन सरकारनें केलेल्या अधिकृत चौकशीच्या प्रतिवृत्तावरून असें उघड होतें कीं, रशियन मालाबद्दल पोलंडकडून रशियास मिळणारी किंमत, पोलंडला रशियाकडून मिळणाऱ्या तितक्याच मालाच्या किंमतीच्या १·८९ पटीनें अधिक असे. अमेरिका व पोलंड यामधील व्यापारांत मात्र याच्या उलट हें प्रमाण ०·९१ इतकें असे. रशिया व हंगेरी आणि अमेरिका व हंगेरी यांमधील व्यापारांत हें प्रमाण अनुक्रमें १·१ आणि ०·५३ इतकें असल्याचें दिसून येतें.

कित्येक व्यापारी व्यवहार रशियानें युक्तायुक्ततेबद्दल कोणताही विधिनिषेध न बाळगतां पार पाडले आहेत. एका देशाकडून अल्प मोबदल्यांत माल घेऊन तो दुसऱ्यास जादा किंमतीनें विकून मधल्यामध्यें जबर नफा उकळणें हा त्यांपैकीं सर्वांत गर्हणीय प्रकार होय. अशा प्रकारचा एक व्यवहार पुढीलप्रमाणें होता. रशिया पोलंडला १२ डॉलर किंमतीचा कापूस पुरवून त्याचे मोबदल्यांत पोलंडकडून १ टन कोक घेत असे. त्यावेळच्या जागतिक किंमतीनुसार या कोकचें मूल्य १४ डॉलर इतकें असे. पोलंडकडून घेतलेला हा कोक पुढें हंगेरीला विकून त्याचे मोबदल्यांत रशिया हंगेरीकडून १७ डॉलर किंमतीचें पोलाद वसूल करीत असे. अशा रीतीनें दर १२ डॉलर-मागें ५ डॉलर्सचा फुकटचा नफा रशिया आपल्या पदरांत पाडून घेत असे.

पोलंडमधील कांहीं शेतजमिनी लागवडीसाठीं रशियन सैनिकांचे ताब्यांत होत्या. त्या जमिनींत पिकणारें धान्य रशियाकडून पोलंडला पुरविलें जात असे. या व्यवहारांतही रशियाची वरील प्रकारची अश्लाघ्य नफेबाजी पुन्हां प्रकट झालेली दिसते. इ. १९४७ मध्यें झेकोस्लोव्हाकियांत निर्माण झालेला धान्यटंचाईचा प्रश्न सोडवितांना रशियन सरकारनें त्या देशांशीं व्यवहार केला तो देखील त्याच्या अवास्तव नफेबाजीच्या वृत्तीचीच ग्वाही देणारा आहे झेकोस्लोव्हाकियाला त्या वेळीं पुरविण्यांत आलेलें धान्य रशियानें हंगेरीकडून अल्प दरांत खरेदी केलें होतें. वस्तुतः त्या वर्षींच्या अवर्षणामुळें हंगेरीतील धान्यपरिस्थितीही बिलकुल समाधानकारक नव्हती. तेथें देखील झेकोस्लोव्हाकियाप्रमाणेंच धान्याची तीव्र टंचाई होती. तथापि रशियानें केवळ स्वतःच्या फायद्याकडे दृष्टि ठेवून हंगेरीवर धान्यनिर्यातीचा बोजा लादला होता. बल्गेरियाशीं झालेल्या एका व्यवहारांत तर ही निंद्य वृत्ती अगदीं कळसाला पोहोंचलेली दिसते. सोव्हिएट सेनांनीं बल्गेरिया पादाक्रान्त केला तेव्हां त्या देशाची अगणित मालमत्ता रशियन सैनिकांकडून लुटली गेली होती. त्यांपैकींच १२७ रेल्वे-इंजिनें आणि ६,००० मालवाहतुकीचे डबे सोव्हिएट सरकारकडून बल्गेरियाला विकण्यांत आले. स्वतःचीच मालमत्ता ! परंतु जबर किंमत देऊन ती बल्गेरियाला रशियाकडून विकत घ्यावी लागली ! !

युद्ध संपल्यानंतर पहिलीं कांहीं वर्षें जगांतील बाजारपेठांत सर्वत्र गोंधळाची आणि अंदाधुंदीची परिस्थिति होती; म्हणून पूर्व युरोपांतील लहान लहान राष्ट्रांना अनेक वस्तूंसाठीं सोव्हिएट संघराज्यांकडून होणाऱ्या पुरवठ्यावर अवलंबून राहावें लागत होतें. तसेंच त्या त्या राष्ट्रांत तयार होणारा माल आपल्या ताब्यांत यावा अशी व्यवस्था रशियानें अत्यंत कौशल्यानें करून ठेवली होती. त्यामुळें साहाजिकच त्या भागांतील आयात-निर्यात व्यापाराची संपूर्ण मक्तेदारी सोव्हिएट सरकारला मिळाली होती. परंतु कालांतरानें युद्धजन्य वातावरण निवळत गेलें; पूर्व युरोपीय राष्ट्रांना केवळ पश्चिम युरोपीय देशांतच उत्पादन होणाऱ्या कित्येक वस्तूंची जरूरी भासू

लागली, आणि त्या त्या देशांत तयार होणाऱ्या मालासही अनेक ठिकाणांहून मागणी येऊं लागली. त्यामुळें रशियाच्या मक्तेदारीस बाधा पोहोंचूं लागली. रशियाच्या आयात निर्यात व्यापाराचें पारडें हलकें होऊं लागलें. विशेषत: पोलंडशीं असलेल्या व्यापारी संबंधांबाबत तर रशियाची परिस्थिति खूपच खालावली. इ. स. १९४५ ते ४८ चे दरम्यान पोलंडमध्यें रशियांतून केली जाणारी आयात पोलंडच्या एकूण आयातीच्या नऊदशांशावरून एकचतुर्थांशावर आली.

आपल्या अंकित प्रदेशांचा पश्चिमी जगताशीं संबंध राखण्यामुळें होणारे फायदे रशियानें ओळखले होते यांत बिलकुल संशय नाहीं.या संबंधांमुळेंच (U. N. R. R. A.) 'अनरा' या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून पूर्व युरोपियन देशांना सुमारें ११० कोटी डॉलर किंमतीचा माल मदतरूपानें मिळूं शकला. या मालांत धान्य, यंत्रसामुग्री, शेतीचीं अवजारें आणि वाहतुकीचीं साधनें अशा निरनिराळ्या वस्तूंचा समावेश होता. या मदतीव्यतिरिक्त वरील रकमेच्या ५० ते ७५ टक्के रक्कम कर्जरूपानें त्या देशांना उपलब्ध होऊं शकली. अंकित प्रदेशांना मिळणाऱ्या या मदतीचा रशियास अप्रत्यक्ष लाभ कशा प्रकारें होत होता याचें सविस्तर स्पष्टीकरण देण्याची येथें आवश्यकता नाहीं. परंतु यासंबंधांत आणखी एका गोष्टीचा विशेषत्वानें उल्लेख करणें जरूर आहे. ती म्हणजे युद्धोत्तर पुनर्रचनेच्या कार्यासाठीं अमेरिकेकडून आपणही भरपूर साहाय्य मिळवावें अशी कल्पना या कालांत रशियन मुत्सद्यांचे मनांत वारंवार खेळत होती. अमेरिकन साहाय्याचे जोरावर आपले राजकीय हेतु साध्य करून घेण्याची ही धूर्त कल्पना रशियन नेत्यांना विशेष विलोभनीय वाटली असणें स्वाभाविक आहे.

# संक्रमण

इ. स. १९४६ ते १९४८ या दोन वर्षांत ज्या विशिष्ट प्रकारच्या घटना घडून आल्या त्यामुळें सोव्हिएट सरकारला आपल्या युरोपीय धोरणाचा फेरविचार करणें भाग पडलें. या सुमारास ग्रीसमधील कम्युनिस्ट आक्रमणाचा पाडाव झालेला होता; अमेरिकेनें 'ट्रुमन तत्त्वा'ची घोषणा केली होती; फ्रान्स आणि इटली या देशांतील कम्युनिस्ट संघटनांनीं केलेले प्रत्यक्ष उठावाचे प्रयत्न फसले होते. सोव्हिएट सरकारच्या पूर्व जर्मनींतील कारवायांमुळें एकूण जर्मन जनतेंत सोव्हिएट राजवटीबद्दल कटु भाव निर्माण झाला होता. त्यामुळें पश्चिम जर्मनींतील कामगार वर्गाचा कम्युनिस्ट चळवळीस कांहीं पाठिंबा मिळू शकेल ही आशा आतां फोल ठरली होती. पश्चिम जर्मनींतील उद्योगधंद्यांवर आपलें प्रभुत्व प्रस्थापित करण्याचे सर्व प्रयत्न अँग्लो–अमेरिकनांनीं सतत व कसून विरोध करून संपूर्णपणें हाणून पाडले होते. मार्शल योजना उधळून लावण्याचे रशियाचे सर्व बेत धुळीस मिळाले होते. आणि त्या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीस युरोपभर प्रारंभ झालेला होता. या योजनेनें बिगरकम्युनिस्ट राष्ट्रांतील जनतेच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनाचे धागे बळकट गुंफून पश्चिमेंतील कम्युनिझमच्या प्रसारास प्रभावी बांध घातला होता. युद्धसमाप्तीनंतर ठिकठिकाणीं निर्माण केल्या गेलेल्या संमिश्र व्यवस्थांत कम्युनिस्ट पक्षीयांचाही शिरकाव झालेला होता. त्या मंडळींचें तेथून हळूहळू परंतु पद्धतशीर उच्चाटन सुरू झालें होतें. युद्धानंतर लवकरच भांडवलशाही गटांतील राष्ट्रांत मंदीची प्रचंड लाट पसरणार असें अनेकांचें भाकित होतें. परंतु परिस्थितीनें तें सपशेल खोटें ठरविलें होतें. अमेरिकेकडे अणुबॉम्बची मक्तेदारी असल्यामुळें पश्चिम युरोपांतील रशियन आक्रमणास प्रभावी पायबंद घालण्याचें सामर्थ्य पाश्चात्य राष्ट्रांना प्राप्त झालें होतें. या वस्तुस्थितीशीं जुळतें घेऊन कांहीं काल तरी आपल्या आक्रमक योजना दूर सारणें सोव्हिएट रशियाला अवश्य झालें होतें.

## ध्येयधोरणाची पुनर्रचना

पश्चिम युरोपांत आपलें आर्थिक प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या सर्व आशा लोप पावल्यानंतर पूर्व व मध्य युरोपांतील राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासाच्या योजनेचा विचार करणें रशियास जरूर झालें. या योजना आंखतांना सायलेशियाच्या विकासास अग्रस्थान देण्यांत आलें होतें. कारण सायलेशियाचा प्रदेश कच्च्या मालाचें कोठार म्हणून प्रसिद्ध होता आणि त्या प्रदेशांत अनेक उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण झालेलें होतें.

पूर्वीं ज्या देशांना, रशियन कारखान्यासाठीं कच्चा माल पुरविणाऱ्या वसाहती एवढेंच स्थान दिलें गेलें होतें त्या देशांत "औद्योगीकरण" हा आतां परवलीचा शब्द झाला होता. सोव्हिएटचा निकटवर्ती स्नेही युगोस्लाव्हिया हा देखील या धोरणास अपवाद नव्हता. सोव्हिएट सरकारचें पहिलें धोरण त्या कालांत मॉस्कोमध्यें रशियन व युगोस्लाव्हिएट शिष्टमंडळांच्या परस्परांत ज्या वाटाघाटी झाल्या त्या वेळीं 'याट्रोव्ह' या रशियन प्रतिनिधीनें काढलेल्या उद्‌गारांवरून स्पष्ट होतें. "तुम्हां युगोस्लाव्हियांना अवजड उद्योगधंद्यांची जरुरीच काय आहे ?" असें विचारून याट्रोव्ह म्हणाला, "तुम्हांला पाहिजे ती सर्व सामुग्री येथें उराल प्रदेशांतील कारखान्यांत भरपूर प्रमाणांत तयार होतच आहे." ✣

रशियाच्या नवीन धोरणाची पूर्व जर्मनींत अंमलबजावणी सुरूं झाली तेव्हां तेथें एक वैशिष्टयपूर्ण दृश्य दिसून येऊं लागलें. जर्मनींतून रशियानें मोठ्या प्रमाणावर जी यंत्रसामुग्री उचलून नेली होती ती आतां पुन्हां अत्यंत झपाट्यानें तेथें अवतीर्ण होऊं लागली होती. रुमानियांतही तसेंच दृश्य दिसून येत होतें. तेथील तेलखाणींची लुटलेली मालमत्ता आतां सोव्होरोम पेट्रोल कंपनीची भरभक्कम उभारणी करण्यासाठीं रुमानियांत पुन्हां परत येऊं लागली होती. ✥ सोव्हिएट सरकारच्या या हालचालीचे मुळाशीं थोडेंसें राजकारणही होतेंच; परंतु त्याचबरोबर उपरोक्त साधनसामुग्रीची ने-आण करतांना आणि मूळ ठिकाणाहून सर्वस्वीं वेगळ्या प्रकारच्या आर्थिक

---

✣ Vladimar Dedijer–Tito Speaks. (London 1953, P.P.256.)
✥ The Economist. April 17, 1954

वातावरणांत त्या सामुग्रीचा वापर करतांना तिची बरीच मोडतोड व नासधूस होऊन ती निरुपयोगी होते ही गोष्ट देखील सोव्हिएट सरकारनें ध्यानांत घेतली असावी.

अंकित प्रदेशांतील सुप्त आर्थिक शक्तींचा विकास घडवून आणण्याचें धोरण ठरवितांना त्यामार्गें त्या प्रदेशांवरील आपली पकड अधिक घट्ट करतां यावी हाच हेतु सोव्हिएट नेत्यांनीं निश्चितपणें मनांत बाळगलेला होता. परिणामीं या धोरणान्वयें त्या त्या देशांतील स्थानिक कम्युनिस्ट पक्षाचे हातांत सर्व सत्तेची मक्तेदारी यावी अशीच रशियाची योजना होती. जे देश रशियाचे परंपरागत शत्रू होते किंवा बल्गेरियासारख्या ज्या देशांचे मनांत युद्धकालांतील व युद्धोत्तर कालांतील कटु अनुभवांमुळें रशियाबद्दल वैरभाव उत्पन्न झाला होता त्या देशांत आपलें आसन स्थिर करण्यासाठीं सत्तेची मक्तेदारी मिळविण्याव्यतिरिक्त अन्य कोणताच मार्ग रशियास मोकळा नव्हता. म्हणून, पहिल्या काळांत ठिकठिकाणीं स्थापन केली गेलेलीं संमिश्र सरकारें रशियानें विसर्जित केलीं.

या रशियन धोरणाची वक्र दृष्टि प्रथम देशोदेशींच्या शेतकरी पक्षांवर वळली. त्या पक्षांना पद्धतशीरपणें नामशेष करण्याचा सपाटा रशियानें चालविलेला होता. प्रथम त्या पक्षांवर विधिमान्य विरोधी पक्ष म्हणून शिक्कामोर्तब करणें; नंतर कम्युनिस्ट पक्षीयांनीं तेथें शिरकाव करून घेऊन पक्ष-संघटनेंतील महत्त्वाच्या जागा काबीज करणें. अशा रीतीनें प्राप्त झालेल्या अधिकाराचा दुरुपयोग करून पक्षसंघटना खिळखिळी करणें आणि अखेर पक्षनिष्ठ शेतकरी पुढाऱ्यांवर–त्यांनीं पूर्वींच देशांतर केलेलें नसल्यास–खोटे आरोप लादून त्यांचा न्यायालयीन बळी घेणें. अशा पायऱ्यापायऱ्यांनीं रशियन धोरणाची प्रगती होत असे.

शेतकरी पुढाऱ्यांच्या मागोमाग कम्युनिस्टांची वक्र दृष्टि लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या समाजवादी पुढाऱ्यांकडे वळली होती. सर्व कामगार-वर्गाची एकजिनसी संघटना निर्माण करण्याची रशियाची घोषणा होती.

त्यासाठीं समाजवादी पक्षाचें साम्यवादी पक्षांत विलीनीकरण घडवून आणण्याचें कार्य त्यांनीं आरंभिलें होतें. या कार्यांत कम्युनिस्टांशीं हातमिळवणी करण्यास तयार होतील तेवढ्याच समाजवादी पुढाऱ्यांना संरक्षण दिलें जाईल अशी भूमिका रशियानें स्वीकारली होती.

अंकित प्रदेशांना राजकीय दृष्ट्या संपूर्णपणें गिळंकृत करण्याचे हेतूनें रशियाचीं पावलें पडत असत. रशियाच्या या हालचालींचा स्वाभाविक परिणाम त्या त्या देशांतील आर्थिक व सामाजिक जीवन ग्रासलें जाण्यांत होणार होता. त्या त्या देशांनीं आपल्याजवळचीं सर्व प्रकारचीं उत्पादन-साधनें सोव्हिएट सरकारचे ताब्यांत दिल्याशिवाय त्यांचा सोव्हिएटविरुद्ध वापर केला जाण्याची भीति रशियन नेत्यांचे मनांतून दूर होणें शक्य नव्हतें शिवाय युद्धामुळें जेथील अर्थव्यवस्था कोलमडून पडलेली आहे आणि ज्या देशांकडे परकीय भांडवलाचा ओघ वळणें केवळ दुरापास्त आहे अशा प्रदेशांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीं कडक नियंत्रणांचा अवलंब करणें अपरिहार्य असतें. चालू उत्पन्नांतून बचत किती करावी आणि उपभोग्य वस्तूंवर किती खर्च करावा याचा निर्णय खाजगी व्यक्तींवर अथवा उद्योगपतींवर सोंपविल्यास देशांत द्रुतगति विकासासाठीं अवश्य तो भांडवल संचय होणें शक्य नसतें.

कोणत्याही देशाचें प्रचंड प्रमाणावर औद्योगीकरण घडत असतांना त्या देशांत श्रमजीवी कामगारांचा एक मोठा वर्ग निर्माण होत असतो. अशा प्रकारचा वर्ग सर्व अंकित प्रदेशांतून निर्माण व्हावा असाही हेतु त्यांच्या औद्योगिकरणाचें धोरण आंखतांना रशियानें मनांत बाळगला असणें शक्य आहे. कारण देशांतील अथवा देशाबाहेरील साम्यवादी राजवटीस या वर्गाचा नेहमींच पाठिंबा मिळत जातो, या मार्क्सप्रणित ठाम सिद्धान्तावर रशियन नेत्यांचा अंधविश्वास होता. ( परंतु हा विश्वास गैरवाजवी असल्याचें पुढें आलेल्या अनुभवांवरून सिद्ध झालें. ) याच विश्वासामुळें राजकीय दृष्ट्या प्रतिक्रान्तिवादी असलेल्या विभागांत निरनिराळ्या उद्योगधंद्यांची मुद्दाम स्थापना करण्यांत आली. असे विभाग म्हणजे दक्षिण पोलंड किंवा स्लोव्हाकिया हे होत.

## परिस्थितींतील परिवर्तन

जनताप्रधान लोकशाहीच्या मूळ कल्पनेंतच कालांतरानें आमूलाग्र बदल होत गेले. चालू अवस्थत जनताप्रधान राज्य म्हणजे सरकारी भांडवलशाही एवढाच अर्थ शिल्लक राहिला होता. सरकारी भांडवलशाही ही कामगार-वर्गाच्या हुकुमशाहीचा नवा अवतार म्हणून मान्यता पावली होती. मार्क्सवाद व लेनीनवाद यांच्या वृक्षास फुटलेली ही नवी फांदी आहे असें या कल्पनेचें समर्थन करण्यांत येऊं लागलें होतें. पूर्व युरोपांतील तत्कालीन घटनांचा अधिकृतरीत्या अन्वयार्थ लावतांना तेथील अपरिहार्य ऐतिहासिक प्रक्रियेंतील उच्चवर्गीय क्रान्तीची अवस्था संपून त्या भागांत आतां श्रमजीवी वर्गाच्या क्रान्ति-प्रयत्नांस प्रारंभ झाला आहे असें सांगण्यांत येऊं लागलें.

आर्थिक संक्रमणाच्या प्रथमावस्थेंत व्यक्तिप्रधान अर्थव्यवस्थेचें सामुदायिक अर्थव्यवस्थेंत रूपांतर घडवून आणण्याच्या प्रक्रियेची गती बरीच मंद होती. विशेषत: ज्या देशांत, विशिष्ट सवलती प्राप्त झालेला परकीय भांडवलदार म्हणून रशियाचें स्थान होतें, त्या देशांत या प्रक्रियेचा वेग अधिकच मंद होता. रुमानियांत राष्ट्रीयीकरणाचें घोडें जोरानें पुढें दामटण्याच्या कल्पनेस रशियाचा विरोध कां होता याचें स्पष्टीकरण वरील वस्तुस्थितींतच सांपडतें. तसेंच रशियानें हंगेरींतील 'अमेरिकन स्टँडर्ड ऑईल कंपनी'ची मालमत्ता बळकाविली होती. त्यासंबंधींची कथा देखील रशियाच्या धोरणावर स्पष्ट प्रकाशझोत टाकते. सवलतीचे परकीय भांडवलदार या भूमिकेंतील रशियाचें वर्तन नि:संशय निर्घृणतेचें होतें. साम्राज्यवादी भांडवलशाही राष्ट्रें वसाहतीं-कडून परंपरेनें ज्या करविषयक सवलती मिळवीत आलेलीं होतीं त्या सर्व सवलती रशियानें आपल्या अंकित प्रदेशांत स्वत:साठीं उपलब्ध करून घेतल्याच होत्या. परंतु त्याशिवाय परकीय देशांत राहाणारे रशियन नागरीक कोणत्याही कारणानें त्या त्या देशांच्या न्यायालयीन कक्षेंत समाविष्ट केले जाऊं नयेत असें रशियाचें मागणें होतें. रुमानियाकडून 'सोव्होरोम पेट्रोल कंपनी'साठीं कांहीं किमान नफ्याच्या टक्केवारीची हमी मिळविण्यांत आले-लीच होती. परंतु त्याशिवाय अँग्लो-अमेरिकन स्पर्धेमुळें सोव्होरोम पेट्रोलच्या

खपावर जो अनिष्ट परिणाम होईल त्याबद्दल त्या कंपनीस नुकसानभरपाई देण्याची जबाबदारीही रुमानियावर लादण्यांत आलेली होती. युगोस्लाव्हियांतील कित्येक कंपन्यांत रशियाचे हितसंबंध गुंतलेले होते. अशा कंपन्यांवर युगोस्लाव्हियन कायद्यानुसार ठरलेले सामाजिक सुरक्षा विम्याचे हप्ते भरण्याचें बंधन असूं नये अशी सवलत युगोस्लाव्हियन सरकारकडून रशियानें मिळवली होती. हंगेरींतही रशियन कंपन्या अशाच सवलती इ.स. १९४७ च्या अखेरपर्यंत उपभोगीत होत्या. त्या वर्षाचे अखेर मात्र अशा सवलती बंद करण्यास रशियानें संमति दिली.

संमिश्र अर्थव्यवस्थेच्या कल्पनेस आतां मूठमाती मिळावयाची होती. इ. स. १९४० व ४८ चे दरम्यान झेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, बल्गेरिया व हंगेरी येथील ज्या लहानमोठ्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण यापूर्वी झालेलें नव्हतें तें आतां घडवून आणण्याचा सपाटा सुरू झाला होता. स्थूलमानानें असें म्हणतां येईल कीं इ. स. १९४८ अखेर अंकित राष्ट्रांतील ८० ते ९० टक्के कारखाने सरकारी मालकीचे झालेले होते. सामुदायिकीकरणाचें हें वारें त्यानंतर ग्रामीण विभागाकडेही पसरूं लागलें होतें.

⁂

अंकित प्रदेशांचा आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कल्पना निश्चित आकार धारण करूं लागतांच त्यांना मूर्त रूप देण्याची प्राथमिक तयारी म्हणून कांहीं अल्पमुदतीच्या छोट्या योजना इ.स. १९४७, ४८ व ४९ मध्यें सुरू करण्यांत आल्या. पूर्व जर्मनीकडे जित राष्ट्र म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन बदलून आर्थिक विकासयोजनेंतील 'सहभागी अंकित प्रदेश' म्हणून त्या देशाचा विचार केला जाऊं लागला. परिणामीं त्या देशाचें राष्ट्रीय उत्पन्न वाढीला लागून इ. स. १९४९ च्या अखेरीस तें त्याच्या इ.स. १९३६ मधील पातळीच्या थोडें कमी येथपर्यंत येऊन पोहोंचलें. रुमानियाव्यतिरिक्त अन्य अंकित राष्ट्रांचें उत्पन्नही त्यांच्या युद्धपूर्वकालीन उत्पन्नाचे रेषेच्या समीप येऊन ठेपलें होतें. अशा रीतीनें सोव्हिएट धर्तीच्या प्रचंड प्रमाणावरील औद्योगिकरणास त्या त्या देशांत अनुकूल भूमि तयार झाली होती.

सोव्हिएट व अंकित देश यांमधील परस्पर आर्थिक संबंधांची बैठकच क्रमशः बदलत चाललेली होती. अंकित प्रदेशांची उघड उघड लूटमार करण्याची प्रवृत्ति हळूहळू मावळूं लागली होती. दूर देशांत राहणाऱ्या सोव्हिएट सेनांचा भार संपूर्णपणें दुसऱ्यावर लोटून देण्याच्या प्रथेसही आळा घालण्यांत येऊं लागला होता. पोलंडमधील कोळशाच्या खाणींकडून नुकसान-भरपाईच्या रूपानें वसूल केली जाणारी रक्कम निम्म्यानें खालीं उतरविण्यांत आली होती. रुमानिया आणि हंगेरी यांनीं नुकसानभरपाईची सहा वर्षांत भरावयाची रक्कम आठ वर्षांत भरण्याची सवलत त्यांना यापूर्वींच दिली गेली होती. आतां उर्वरित कर्जाच्या रकमेबाबत त्यांना पन्नास टक्क्यांची सूट देण्यांत आली होती. तसेंच त्या देशांतून रशियास निर्यात होणाऱ्या मालाचे व मालवाहतुकीचे दर ठरवितांनाही त्या देशांवर पडणारें अन्याय्य दडपण दूर करण्याचें धोरण रशियाकडून स्वीकारलें गेलें होतें.

अंकित प्रदेशांची उत्पादनक्षमता युद्धपूर्वकालीन पातळीवर आणण्याचा हेतु साध्य करण्यासाठीं त्यांचेवरील परकी देण्यांचा बोजा अशा प्रकारें कांहींसा हलका करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. डॉक्टर केमेनी यांनीं प्रयत्न-पूर्वक गोळा केलेल्या आंकडेवारीवरून* असें दिसून येतें कीं, इ. स. १९४७–४८ या वर्षीं हंगेरीच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकीं ६·५ टक्के रक्कम त्या देशांस युद्धकर्जाच्या परतफेडीचे कामीं खर्च करावी लागत होती. तेथून इ.स.१९४९ मध्यें हें प्रमाण ३·५ टक्क्यांपर्यंत खालीं आलें होतें. याच कालांत त्या देशां-तील भांडवली गुंतवणीचें प्रमाण १३·५ ते १४·५ टक्क्यांवरून सुमारें २०·५ टक्क्यांपर्यंत वर गेलें होतें. आणि इ. स. १९४९ मध्यें तर या गुंतवणीनें २१·५ टक्क्यांची पातळी गांठलेली होती.

प्रत्यक्ष लूट करण्याच्या धोरणांत जसजसा बदल होत गेला तसतसा सोव्हिएट व अंकित प्रदेश यांमधील व्यापारीसंबंधांचा पायाही रुंदावत गेला. इ. स. १९४८ पासून जर्मनीबाबतही वरील वस्तुस्थितीचाच स्पष्टपणें

* G. Kemeny–Economic Planning in Hungery; 1947–49. (London 1952, Page 123.)

पडताळा येऊं लागला. आर्थिक धोरणांतील या ठळक परिवर्तनाबरोबर परस्परांतील व्यापारी देवघेवीचें प्रमाण एकसारखें वाढत गेलें. अंकित प्रदेशांच्या परराष्ट्रीय व्यापारांत त्यांच्या रशियाशीं होणाऱ्या व्यापाराचें प्रमाण फार मोठें होऊं लागलें. रशियाच्या आर्थिक धोरणाचें परिवर्तन पूर्ण होण्यापूर्वींच मध्य युरोपांतील त्याच्या अंकित राष्ट्रांच्या परदेशी व्यापाराचें स्वरूप खूप बदलून गेलें होतें. राष्ट्रमंडळांतील निरनिराळे घटक आपले पन्नास टक्के व्यापारी व्यवहार आपआपसांतच करूं लागले होते. बल्गेरिया आणि रुमानिया या दोन घटकांबाबत तर हें प्रमाण ८० टक्क्यांवर गेलें होतें.

अंकित प्रदेशांतील सरकारांना मार्शल योजनेनुसार मिळणारी मदत नाकारण्याचा आदेश देऊन रशियानें त्यांचे पश्चिमी राष्ट्रांशीं असलेले संबंध अचानकपणें तोडून टाकले होते. या रशियन आदेशामुळें स्वाभाविकच त्या देशांत भांडवली टंचाईची परिस्थिती उत्पन्न झाली होतीं. या आणीबाणीच्या परिस्थितींत त्या देशांच्या मदतीस धांवून जाऊन त्यांना अवश्य त्या सामुग्रीचा आणि कर्जाचा पुरवठा करण्याची जबाबदारी शिरावर घेणें सोव्हिएट सरकारला अटळ झालें होतें.

या अवस्थेंत आतां सोव्हिएट संघराज्यानें आपल्या नवीन आर्थिक साम्राज्याची तटबंदी भक्कम करण्यासाठीं अंकित प्रदेशांना प्रत्यक्ष साहाय्य करण्याची तयारी दाखविली. इ. स. १९४८ च्या प्रारंभीं, आपण पोलंडला कर्जाऊ रक्कम देण्यास तयार आहोंत अशी घोषणा रशियाकडून करण्यांत आली. मार्शल योजनेंतून मिळणाऱ्या मदतीचा ओघ आटल्यामुळें पोलंडची होणारी हानी भरून काढण्याचे हेतुनेंच हें कर्ज देण्यांत येणार होतें.

# अप्रत्यक्ष लूट

युरोपांतील व्यवहारांत अयशस्वी झाल्यामुळें एकप्रकारें कोंडींत सांपडल्यासारखी रशियाची परिस्थिती झाली होती. ही कोंडी फोडून बाहेर पडण्याचे प्रयत्न रशियानें सन १९४९-५० चे सुमारास सुरू केले. ज्या भागांत आपणांस कमींत कमी विरोध होईल त्या भागांत आपलें विस्ताराचें क्षेत्र ठेवण्याचें धोरण त्यानें अंगिकारलें. आंतरराष्ट्रीय वातावरणांत फार मोठी खळबळ माजणार नाहीं अशा बेतानें, सरहद्दीवरील प्रदेशांत आक्रमक लष्करी हालचाली सुरू करण्यावर या नवीन धोरणाचा विशेष भर होता. परंतु, कोरियन सरहद्दीवर या धोरणाचा जो प्रयोग रशियानें केला, त्याला पश्चिमी राष्ट्रांकडून अनपेक्षितपणें अत्यंत कडवा विरोध झाला. या विरोधामुळें जागतिक वातावरण अत्यंत तंग झालें, आणि त्यामुळें अंकित प्रदेशांत सत्तेचें केंद्रीकरण करण्याकडे असलेली रशियाची प्रवृत्ति अधिकच दृढ झाली. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टचा सर्व अंकित प्रदेशांची एकत्र मोट बांधून आणि त्यांची सर्व प्रकारची उत्पादनसामग्री एकत्र करून ती एकाच हेतूच्या पूर्ततेसाठीं राबविण्याचे धोरणास यापुढें अधिकच बळकटी येत गेली.

स्थानिक कम्युनिस्ट पुढाऱ्यांना आपापल्या देशांतील सरकारांत मोक्याच्या जागा देऊन, त्यांच्यावर संपूर्णपणें विसंबून राहण्याची प्रथा, यानंतर बंद करण्यांत आली. राष्ट्रीय समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्या पक्षांवर सांप्रदायिकतेचा शिक्का मारण्यांत येऊं लागला. सोव्हिएट सरकारच्या आज्ञांची अंधपणें अंमलबजावणी करतील अशाच व्यक्तींना अधिकाराच्या जागांवर ठेवण्यास सुरुवात झाली. कांहीं महत्त्वाचीं अधिकारपदें तर रशियन नागरिकांनासुद्धां देण्यांत आलीं.

या प्रक्रियेस पूर्वी वर्णन केलेल्या कालखंडाचे अखेरीस प्रारंभ झाला. एकपक्षीय वर्गसंघटना त्या वेळीं पूर्णपणें उभारली गेलेली होती, आणि अनावश्यक व्यक्तींची पक्षसंघटनेंतून उचलबांगडी करून, निरनिराळ्या

देशांतील कम्युनिस्ट पक्षांचें शुद्धीकरण करण्यांत आलें होतें. या शुद्धीकरणाचें सत्रांतच पोलंडमधील गोमुल्काची आणि रुमानियांतील पॅट्राशूंची राजवट कोलमडून पडलेली होती. युगोस्लाव्हियाचीही कदाचित अशीच अवस्था झाली असती; परंतु अगदीं ऐनवेळीं मार्शल टिटो सोव्हिएटपासून फुटून निघाल्यामुळें त्या देशांचा रशियापासून बचाव झाला. टीटोच्या या प्रकारच्या वागणुकीचा परिणाम इतर देशांतील पुढाऱ्यांबद्दलही रशियाचे मनांत जबरदस्त साशंकता उत्पन्न होण्यांत झाला; आणि त्यामुळेंच आणखीही कित्येक कम्युनिस्ट पुढाऱ्यांची अधिकारपदावरून व पक्षसंघटनेंतून हकालपट्टी झाली.

## बदललेला मार्ग

अंकित प्रदेशांवर रशियाचें प्रभुत्व पूर्णपणें प्रस्थापित होऊं लागतांच रशियन सरकारचे मनोवृत्तींत आणखी एक मूलभूत बदल सुरूं झाला. अंकित प्रदेशांची मालमत्ता ही 'परकीय मालमत्ता' नसून ती आपली घरचीच संपत्ती आहे, असें मानण्यास रशियानें प्रारंभ केला. पूर्वींचे, उघडपणें धाऊक लूट मारण्याचे मार्ग आतां जीर्ण व निरुपयोगी झाले होते. नुकसानभरपाईचे रूपानें मिळणाऱ्या रकमेचा ओघही आटला होता. हंगेरीनें इ. सन १९५२ मध्यें आणि रुमानियानें इ. सन १९५३ मध्यें अशा प्रकारचा भरणा बंद केला होता. जर्मनीलाही इ. सन १९५० मध्यें कांहीं सूट मिळाल्यामुळें सन १९५४ पर्यंत तिनें आपलें देणें देऊन टाकलें होतें.

इ. सन १९५२ च्या हिवाळ्यांत हंगेरींतील सोव्हिएट मालकीच्या कारखान्यांची व्यवस्था हंगेरियन सरकारचे हातीं देण्यांत आली होती. इ. सन १९५४ च्या सुमारास पूर्व जर्मनींतील सर्व एस्. ए. जी. कंपन्या कम्युनिस्ट सरकारकडे सुपूर्त करण्यांत आल्या होत्या. तथापि एका पूर्वकालीन सोव्हिएट अधिकाऱ्याचे विधानानुसार नियोजन आणि उत्पादन यांवर सोव्हिएट संघराज्याचें इतकें वर्चस्व होतें कीं, एस्. ए. जी. चे अधिकाऱ्यांना न जुमानतां निरनिराळ्या योजना आंखणें व त्यासंबंधीं निर्णय घेणें त्यांना शक्य होतें.

रुमानिया, बल्गेरिया व हंगेरी यांचे बाबतही हेंच सत्य लागूं पडतें. इ. सन. १९५४ चे सुमारास त्या देशांतील संयुक्त मालकीच्या कारखान्यांवरील आपल्या मालकी हक्कांवर, रशियानें किफायतशीर मोबदला घेऊन, अधिकृतरीत्या पाणी सोडलें होतें. या मोबदल्याची रक्कम मात्र केव्हांच जाहीर केली गेली नाहीं.

एकीकडे हे प्रकार चालू असतांनाच आपल्या मित्रत्वाची आणि परस्परविश्वासाची ग्वाही देणारा पुरावा म्हणून रशियानें सोव्हिएट-जर्मन विस्मुथ कंपनीची संयुक्त भांडवलाचे तत्त्वाबर स्थापना केली होती. ( हीच कंपनी रशियास प्रतिवर्षीं ९०० टन कच्च्या युरेनिअमचा पुरवठा करते. )

या बदलत्या परिस्थितींत, आधींपासून ताण देत असलेलीं आर्थिक लक्ष्यें अधिकच उंचावण्यांत आलीं. पोलंडमधील व हंगेरींतील औद्योगिक उत्पादन ६०टक्क्यांनीं वाढविण्याचा निर्णय घेण्यांत आला. झेकोस्लोव्हाकियाचें उत्पादन ३३ टक्यानें वर नेण्याचें ठरविण्यांत आलें आणि त्यांत भांडवली सामग्रीच्या उत्पादनावर विशेष भर देण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें.

ज्या देशांना परकीय भांडवलाचा पुरवठा होण्याची सुतराम् शक्यता नाहीं, तेथील जनतेलाच अखेर आपल्या पोटास चिमटा घेऊन, औद्योगिकरणासाठीं लागणाऱ्या भांडवलाची उभारणी करावी लागते. वरील प्रदेशांत सुमारें २५ टक्के राष्ट्रीय उत्पन्न, भांडवल गुंतविण्यासाठीं बाजूस काढून ठेवावें लागेल, असा अंदाज व्यक्त करण्यांत आला होता. तथापि प्रत्यक्षांत हें प्रमाण मात्र यापेक्षां बरेंच अधिक असल्याचें दिसून येतें. मूळ योजनांच्या अंमलबजावणीस प्रारंभ होतांच गुंतवणीच्या रकमेबाबत ठरलेल्या मर्यादा पद्धतशीरपणें उल्लंघिल्या जात असल्याचें दिसून येत होतें. परंतु त्याच वेळीं, राष्ट्रीय उत्पन्नांची पातळी मात्र अपेक्षिल्याइतकी वर जात नव्हती.

सोव्हिएट हितसंबंधांची जपणूक करण्यासाठीं उभारण्यांत आलेल्या सैन्याचा व निमलष्करी संघटनांचा खर्च भागविण्यासाठीं बसविण्यांत आलेल्या जबरदस्त करांच्या ओझ्याखालीं जनतेची कंबर आधींच वांकून गेली होती, त्यांतच सरकारी यंत्रणेवरील आणि पक्षसंघटनेवरील वाढत्या खर्चाची एकसारखी भर पडत होती.

इ. सन. १९४७ ते ५४ चे दरम्यान रशियानें अंकित प्रदेशांत १३ लाख सैन्य उभें केलें. इ. सन १९५१ पर्यंत पायदळ आणि हवाई दल यांची मिळून सैनिक संख्या १२,१०,००० होती.* म्हणजे त्यानंतरच्या तीन वर्षांत प्रत्यक्ष सैनिकसंख्येंत फार मोठी भर पडलेली नाहीं. परंतु, प्रत्येक सैनिकावर होणाऱ्या खर्चाचें प्रमाण मात्र, या तीन वर्षांत पूर्वीच्या दुप्पट झालें. या वाढत्या खर्चाचें कारण सैनिकांना पुरविण्यांत येणाऱ्या शस्त्रास्त्रांचें यांत्रिकीकरण व आधुनिकीकरण व विशेषतः विमानदलाची दुपटीनें वाढ हेंच असलें पाहिजे असें सिद्ध होतें. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यासाठीं अवश्य असलेल्या मनुष्यबळाच्या दृष्टीनें विचार करतां, इ. सन १९५१ पर्यंत चालू असलेली सैन्यभरती यापूर्वीच सुरक्षिततेच्या मर्यादा ओलांडून पुढें गेलेली होती. आणि इ. सन. १९५३–५४ मध्यें या सेना आधुनिक शस्त्रांस्त्रांनीं सुसज्ज करण्याकडे देशांतील महत्त्वाच्या साधनसामग्रीचा ओघ वळविला गेल्यामुळें देशांत महत्त्वाच्या अनेक वस्तूंची टंचाई निर्माण झाली होती.

अंदाजपत्रकांच्या मांडणींतील प्रचलित प्रथांमुळें, वस्तुतः शस्त्रास्त्रांवर होणारा किती खर्च, अन्य शीर्षकांखालीं दाखविण्यांत आला होता हें अचूक सांगणें दुर्दैवानें कठिण आहे. युद्धपूर्व कालांतही शस्त्रसंभाराचा सर्वांत मोठा उत्पादक म्हणून झेकोस्लोव्हाकियाची ख्याती होती. युद्धोत्तर काळांत झेकोस्लोव्हाकियांतील या उत्पादनाचें प्रमाण अधिकच वाढलें आहे. तो देश सर्व प्रकारचीं आधुनिक शस्त्रास्त्रें उत्पादन करण्यास आजही समर्थ आहे, या श्री. सेपिका यांचे सांगण्यावर विश्वास ठेवणें फारसें धोक्याचें ठरण्याजोगें नाहीं !* दुसरा अंकित प्रदेश म्हणजे पोलंड. 'बेरूट' यांचें मतें या देशांतील शस्त्रनिर्मितीचा व्यवसाय एवढा विस्तारला आहे कीं, खूप मोठ्या सेनांस आधुनिक शस्त्रसामुग्रीनें सुसज्ज करण्याचें सामर्थ्य आज त्या व्यवसायांत आहे.

अनेक वेळां असें सांगितलें जातें कीं, अंकित प्रदेशांत राष्ट्रीय उत्पन्नाचा

* Under Secretary of War's statement in the House of Commons. (The Times, May 12, 1954.)

* Statement to the Tenth Party Congress, June 1954.

७५ टक्के भाग चालू उपभोगासाठीं खर्च होत असतो. परंतु याबाबत असें दिसून येतें कीं, प्रत्यक्ष भांडवलनिर्मितीव्यतिरिक्त अन्य सर्व खर्चाच्या बाबींचा समावेश चालू उपभोगाच्या सदरांत करून हा आंकडा सांगितला जातो. याचा अर्थ, त्या देशांत शासनाचा आणि पक्षसंघटनेचा खर्च, तसेंच सैन्य व सुरक्षा दलें यांवर होणारा खर्च, हा जनतेचा उपभोगखर्च म्हणूनच गणला जातो.

पोलंड देश उदाहरणादाखल घेऊन तेथील लष्करी व निमलष्करी बाबींवरील खर्चाचा अंदाज घेतल्यास, तो राष्ट्रीय उत्पन्नाच्या १२ टक्के असल्याचें आढळून येतें. यांतच महत्त्वाच्या वस्तूंचे सांठे उभारण्यासाठीं होणारा खर्च जमेस धरल्यास हें प्रमाण १५ टक्क्यावर जात असल्याचें दिसतें. इतर अंकित प्रदेशांबाबतही साधारणतः हीच आंकडेवारी लागू पडते. युद्धपूर्व कालांत या देशांना लष्करावर होणाऱ्या खर्चाचा जो बोजा पत्करावा लागत असे, त्या मानानें हल्लींच्या खर्चाचें प्रमाण फारच मोठें आहे.

पोलंडबाबत यापुढें असाही अंदाज व्यक्त करण्यांत आला आहे कीं, इ. स. १९५४ मध्यें या देशांत केवळ ४५ टक्के राष्ट्रीय उत्पन्नच उपभोक्त्यांचे वांटचास आलें. म्हणजे त्या वर्षीं दर आठवडचास प्रत्येक व्यक्तीचे पदरांत चालू उपभोगांसाठीं केवळ चारच डॉलर्स पडत असत. झेकोस्लोव्हाकियांतील परिस्थितीही त्या काळांत अशीच होती. इ. स. १९५३ मध्यें राष्ट्रीय उत्पन्नापैकीं केवळ ५७ टक्के भाग वैयक्तिक उपभोगासाठीं जनतेस उपलब्ध होता. ✠

## अभूतपूर्व आर्थिक साम्राज्य

युद्धोत्तरकालीन राजकीय व आर्थिक घडामोडींतून सोव्हिएट प्रदेशांत अभूतपूर्व आर्थिक साम्राज्याचा उदय झालेला आहे. प्रादेशिक व्याप, कडक नियंत्रणें आणि सत्तेचें केंद्रीकरण यांपैकीं कशांतच या साम्राज्याला, जगाच्या इतिहासांत दुसरी तोड सांपडण्याजोगी नाहीं.

सोव्हिएटचे व्यापारी करार, त्यांच्या व्यापारी प्रदेशाच्या कक्षा आणि

✠ Minister of Finance's Statement to Czechoslovak National Assembly. ( March, 8-10-1954. )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८५६८ दि: ... १ ३
क्रमांक ...११६२... नों दि ...

तेथील किंमती आणि हुंडणावळीचे दर यांचा अनेक वेळां उल्लेख केला जातो. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, निरनिराळ्या अंकित प्रदेशांच्या आर्थिक व्यवहारांची एकत्र गुंफण घडवून आणण्याचे प्रक्रियेंत फार तर, तेथील व्यापाराच्या प्रमाणांत कांहीं फरक पडत असेल परंतु, त्याचें मूळ स्वरूप मात्र कायमच राहातें. म्हणजे एका प्रदेशांतून दुसऱ्या प्रदेशांत आयात अथवा निर्यात होणाऱ्या वस्तू त्याच असतात.

इ. स. १९४९ मध्यें अंकित प्रदेशांसाठीं परस्पर-सहाय्यक मंडळाची स्थापना करण्यांत आली. या नांवाचा गोंडस ( कॉमेकॉन ) बाह्य देखावा म्हणून उपयोग झाला असेल. तथापि हें उघड आहे कीं, या मंडळाची स्थापना करून, अंकित प्रदेशांबाबत आंखलेल्या आपल्या योजनांचें एकसूत्रीकरण आणि अंमलबजावणी करणारें साधन रशियानें निर्माण केलें होतें. नुकत्याच प्रसृत झालेल्या वार्तेवरून असें दिसतें कीं, संपूर्ण सोव्हिएट गटासाठीं आर्थिक नियोजन आणि द्रव्यपुरवठा करणारी एक मध्यवर्ती संघटना निर्माण करण्याचा सोव्हिएट सरकारचा मानस आहे. ही वार्ता जर खरी असेल तर, त्याचा अर्थ एवढाच आहे कीं, आज आधींच अस्तित्वांत असलेल्या यंत्रणेंत नवीन ध्येयास अनुकूल असे कांहीं बदल घडवून आणण्याचा सोव्हिएट सरकारचा विचार आहे.

◆◆ ◆◆ ◆◆ ◆◆

सोव्हिएटच्या आर्थिक साम्राज्यांतील अंतर्गत व्यापार कांहीं दीर्घ मुदतीच्या परस्पर-करारांनुसार होत असतो. वस्तुतः खऱ्या अर्थानें हे परस्पर-करार नसून विकास योजनांची योग्य गुंफण करण्यासाठीं रशियानें वापरलेलें तें एक साधन आहे. ही वस्तुस्थिती मिकोयाननेंही मान्य केलेली आहे. तथापि अंकित प्रदेशांच्या शिल्लक सार्वभौमत्वाची ग्वाही देण्यासाठीं 'करार' हा शब्द या संबंधांत अद्याप वापरला जातो.

या करारान्वयें घडणाऱ्या व्यापाराचा जागतिक किंमतीशीं कांहीं संबंध असण्याची यत्किंचितही आवश्यकता आतां मानली जात नाहीं. त्याऐवजीं साम्यवादी समाजरचनेस पोषक अशी स्वतंत्र किंमत-यंत्रणा उत्पन्न करण्याकडे त्यांचा कल असतो.

सोव्हिएट संघराज्यांत सरकारी मालकीच्या निरनिराळ्या संस्थांचे परस्परांतील देवघेवीचे व्यवहार मुद्दाम ठरवून दिलेल्या किमतीनुसार होत असतात. या किमती मागणी–पुरवठ्याच्या नियमावर किंचितही अवलंबून नसतात. व्यवसायाची उत्पादनक्षमता आणि योजनापूर्तीची पातळी मोजण्याचें साधन म्हणून किमतीचें स्थान असतें. सोव्हिएटच्या अंकित प्रदेशांतही हीच पद्धती रूढ करण्यांत आली आहे.

प्रथम कांहीं दिवस अंकित प्रदेशांत परस्परांतील देवघेवीच्या व्यवहारांचे हिशेब डॉलरमध्यें करण्यांत येत असत. परंतु ही प्रथा सोव्हि-एटच्या प्रतिष्ठेला बाध आणणारी असल्यामुळें ती आतां निरूपयोगी ठरविण्यांत आली होती. इ. सन १९५० च्या मार्चमध्यें रशियानें आपली चलनव्यवस्था सुवर्णपरिमाणावर अधिष्ठित असल्याचें उद्‌घोषित केलें तेव्हांपासून अंकित प्रदेशांनीं परस्परांतील व्यवहारांचे हिशेब डॉलरऐवजीं रूबलमध्यें ठेवण्याबद्दल रशियाचा आग्रह सुरू झाला. तसेंच, अंकित प्रदेशां-तील निरनिराळीं राष्ट्रीय चलनें रशियन रूबलला जोडलेलीं असावींत, असेंही रशियाचें मागणें होतें. या धोरणाचा अन्तर्गत व्यापाराशीं कांहीं संबंध नव्हता.

❖ ❖ ❖ ❖

दोन समाजवादी बंधुराष्ट्रांचे परस्परांतील व्यापारी संबंध कोणत्या तत्त्वांवर अधिष्ठित असावेत याचें भरपूर विवेचन अनेक मार्क्सवादी विचार वंतांनीं केलेलें आहे. हें विवेचन करतांना निरनिराळ्या देशांच्या आर्थिक विकासाची पातळी ( म्हणजेच कामगारांची उत्पादनक्षमतेची पातळी ) भिन्न असणें अपरिहार्य आहे ही गोष्ट नीट ध्यानांत घेतली गेली होती. एकाद्या राष्ट्रास कमी श्रमाचें अधिक फळ मिळाल्यामुळें उत्पन्न होणारी अन्याय्य परिस्थिती कशी टाळतां येईल हा या विचारवंतांचे पुढें महत्त्वाचा प्रश्न होता. कारण, मार्क्सचे मतें मानवी श्रम हेंच कोणत्याही वस्तूच्या मूल्याचें उगमस्थान व मोजमाप असतें. युगोस्लाव्हियानें आपल्या स्वप्न-भंगानंतर, अखिल जगतास आपल्या सोव्हिएटसंबंधांची करुण कहाणी

निवेदन केली तेव्हां त्या कथनांत वरील तत्त्वांचे दु:खद प्रतिध्वनी स्पष्टपणें ऐकूं येत होते.

सोव्हिएट राष्ट्रमंडळासाठीं रशियानें आंखलेल्या विकास योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांसंबंधीं दोन शब्द लिहीणें येथें प्रस्तुत होईल. रशियाच्या व्यापक आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून ही योजना आंखली गेली होती. तिचीं उद्दिष्टें पुढीलप्रमाणें होतीं.

( अ ) प्रत्येक देशांतील उपलब्ध सामुग्रीचा आणि सुप्त आर्थिक शक्तींचा जास्तींत जास्त वापर करणें.

( ब ) रशिया व अंकित राष्ट्रगट यांच्या सामुग्रींत व विकासांत संवादित्व उत्पन्न करणें.

( क ) वरील उद्दिष्टांच्या सफलतेसाठीं किमान खर्चाच्या मार्गाचा अवलंब करणें.

अंकित राष्ट्रांच्या आर्थिक सामर्थ्याचा विकास घडवून आणण्यासाठीं रशियास लागलेली ओढ पाहून नि:पक्ष निरीक्षक बुचकळ्यांत पडतो. एकीकडे आपल्या देशांतील पोलाद-कारखान्यांसाठीं लागणारी यंत्रसामुग्री पश्चिमी राष्ट्रांकडून विकत घेत असतांनाच, मध्य युरोपांतील राष्ट्रांत मोठमोठे लोखंड व पोलाद-कारखाने उभे करण्याची जबाबदारी पत्करण्यांत रशियाचा हेतु काय असावा असा प्रश्न त्यांचेपुढें उभा राहातो.

अंकित प्रदेशांचें आर्थिक सामर्थ्य वाढविण्याची रशियाची ओढ प्रामाणिक आहे काय ?

अशा प्रश्नांच्या उत्तरासाठीं प्रत्यक्ष रशियांतील आर्थिक विकास कोणत्या दिशेनें घडून येत आहे त्याचें नीट अवलोकन केलें पाहिजे. गेलीं दहा पंधरा वर्षें रशियन अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदु युरोपीय प्रदेशांपासून दूर सरकत आहे. आर्थिक, राजकीय तसेंच संरक्षणविषयक विचारांतून हा बदल हेतुत: घडवून आणला जात आहे. युद्धोत्तर कालांतील कोळशाच्या वाढत्या उत्पादनांत पूर्व रशियन प्रदेशांतील व्यवसायकेंद्रांचा जवळ जवळ ६० टक्के वांटा आहे, असें १९५० मध्यें दिसून आलें. याच कालांत पूर्वींच्या बाकु प्रदेशांतील तेलाचें उत्पादन कमी होऊनही सोव्हिएटच्या एकूण तेलउत्पादनाची

पातळी पूर्वीपेक्षां २५ टक्क्यान वर गेली असल्याचें आढळून आलें. पूर्व प्रदेशांतील नव्या उत्पादन-योजनांचाच हा परिणाम होता. लोखंड व पोलाद यांच्या उत्पादनाबाबतही हीच वस्तुस्थिती निदर्शनास येते. * सोव्हिएट योजनाकारांनीं वाहतुकीच्या वाढीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलें असावें असें दिसतें. वाहतुकीच्या साधनांचें जाळें विणण्यासाठीं बराच मोठा अवधी व द्रव्यनिधी लागत असल्यामुळें औद्योगिक विकासापूर्वीं वाहतुक-योजना पूर्ण करण्याऐवजीं ती त्यानंतर सुरू करण्यांत यावी असें त्यांचें मत आहे.

अशा परिस्थितींत आर्थिक दृष्टचा स्वयंपूर्ण असे नवीन औद्योगिक विभाग निर्माण करण्याकडे रशियन धोरणाचा कांटा झुकूं लागला आहे. विभागांची स्वयंपूर्णता याचा अर्थ अंतर्विभागीय व्यापार शक्य तितका मर्यादित करणें हा होय.

सोव्हिएट संघराज्यांतील मोठे उद्योगधंदे पांच विभागांत केंद्रित झालेले आहेत. या विभागांनीं रशियाच्या एकूण क्षेत्रफळांतील केवळ ७ टक्के प्रदेश व्यापला आहे. याशिवाय रशियावर अवलंबून असलेल्या निकटवर्ती राष्ट्रांचा मिळून एक सहावा औद्योगिक विभाग तयार झालेला आहे.

सोव्हियटअंतर्गत पांच विभागांसाठीं जें औद्योगिक धोरण रशियानें स्वीकारलें आहे, तेंच सर्वसाधारणपणें या सहाव्या विभागालाही लागू करण्यांत आलें आहे. त्यामुळें अंकित प्रदेशांतील उपलब्ध उत्पादनसामुग्री आणि त्यांचें प्रत्यक्ष उत्पादन यांत मेळ राहिलेला नाहीं. सोव्हिएट रशियाचे पश्चिम प्रदेश आणि त्यांचे अंकित प्रदेश यांतील साधनसामुग्री आणि उत्पादन यांची तुलना केल्यास, तेथील वस्तुस्थितीचें चित्र स्पष्टपणें डोळ्यापुढें उभें राहील. उदाहरणादाखल, कोळशाचाच विचार करतां येईल. जळणाचें साधन म्हणून, तसेंच, रासायनिक व धातुकामाच्या धंद्यांतील मूलभूत महत्त्वाचें द्रव्य म्हणून कोळशाचें स्थान आहे. सोव्हिएट संघराज्यांतील खाणींत १५०० दशलक्ष टनांचा कोळशाचा सांठा आहे, असें रशियाचें म्हणणें आहे. परंतु यापैकीं कठिण कोळसा किती आणि पश्चिम रशियन

* E. C. E. Economic Survey of Europe in 1950. ( P. 41. )

प्रदेशांत तो किती प्रमाणांत सांपडतो याचा विचार केल्यास, एक वेगळेंच चित्र पुढें उभें राहतें. या तुलनेंत अंकित प्रदेशांतील कोळशाचा सांठा जमेस धरून पश्चिम रशियाच्या कोळशाच्या कोठाराचा हिशोब केल्यास, त्यांत मूळ रकमेची तिपटीनें वाढ झाल्याचें दिसून येतें. कोकच्या कोळशाचा सांठाही अशाच प्रकारें ६० टक्क्यानें वर गेल्याचें दिसतें. याच धर्तीनें कोळशाच्या प्रत्यक्ष उत्पादनाचा विचार केल्यास, आणखी महत्त्वाच्या गोष्टी प्रकाशांत येतात. अंकित प्रदेशांतील कठिण कोळशाचें उत्पादन प्रतिवर्षी ११५ दशलक्ष टनांचें आहे. ( त्यापैकीं सुमारें ९० दशलक्ष टन एकट्या पोलंडमधून मिळतात). पश्चिम रशियन प्रदेशांतील याच उत्पादनाचें प्रमाण एकूण रशियन उत्पादनाच्या पन्नास टक्क्यांइतकें आहे. रशियांतील कठिण कोळशाचें उत्पादन सुमारें २८० दशलक्ष टनांचें आहे.

लोखंडाच्या खाणींबाबत मात्र जरा वेगळी परिस्थिती आहे. अंकित प्रदेशांतील खाणींत लोखंडाचे सांठेही फारसे मोठे नाहींत, आणि तेथें जें लोखंड सांपडतें तें विशेष उच्च प्रतीचेंही नाहीं. याच्या उलट रशियन प्रदेशांतील खाणींतून इ. सन १९५१ मध्यें २५ दशलक्ष टन लोखंडाचें उत्पादन झालें. अंकित राष्ट्रांत मात्र आटोकाट प्रयत्न करूनही लोखंडाचें उत्पन्न २० लक्ष टनांपुढें जाऊं शकलें नाहीं.

सोव्हिएट प्रदेशांतील खाणींत धातूंचे प्रचंड सांठे आहेत ही गोष्ट ध्यानांत घेऊनही, तेथें सहज उपलब्ध होऊं शकतील अशा उत्कृष्ट दर्जाच्या कच्च्या धातूंच्या टंचाईचा प्रश्न त्यांना पुढील पिढींत तीव्रतेनें भेडसावूं लागल, अशीं स्पष्ट चिन्हें आज दिसत आहेत.

परंतु अंकित प्रदेशांतील कोळशाच्या सांठ्याचा पुरेपुर उपयोग करून घेण्यासाठीं, त्यांचा रशियांतील धातूंच्या सांठ्याशीं संबंध जोडून देणें अपरिहार्य होतें. आणि तसें करतांना धातूच्या खाणींच्या भागांत कोळशाची आयात करण्यापेक्षां कोळशाच्या प्रदेशांत रशियांतील कच्च्या धातूंची निर्यात करणें अधिक किफायतशीर दिसत होतें. सबंध सोव्हिएट प्रदेशाच्या विकासाची तरतूद करतांना, सोव्हिएट योजनाकारांचे मनावर वरील विचारांचा बराच पगडा होता असें आढळतें.

सायलेशिया, ओस्ट्राव्हा आणि कार्व्हिना, या प्रदेशांचा, सोव्हिएट साम्राज्यांत शोभून दिसेल असा एक स्वयंपूर्ण आर्थिक घटक बनविण्यांत आला आहे. अशा प्रकारच्या अन्य घटकांप्रमाणेंच, याही घटकांवर कांहीं जबाबदारी सोंपविण्यांत आलेली आहे. आपल्या परिसरांत, आढळणाऱ्या खनिज संपत्तीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेऊन, तयार मालाच्या कारखान्यांचा विस्तार वाढविण्याचें काम, या घटकांना करावयाचें आहे. खनिज संपत्तीप्रमाणेंच उपलब्ध तांत्रिक ज्ञानाचा, कुशल कारागिरांचा आणि अन्य उत्पादक सोयी-सवलतींचा भरपूर वापर केला जाईल याकडे या घटकांनीं लक्ष पुरवावयाचें आहे.

या औद्योगिक विस्तारामुळें, थोड्याच दिवसांत, रशिया आणि अंकित प्रदेश यांमधील व्यापारी देंवघेवींत, कच्च्या मालापेक्षां तयार वस्तूंचें प्रमाण अधिक राहील अशी अपेक्षा आहे.

अंकित प्रदेशांतील कच्चा माल तेथील कारखान्यांतच वापरण्याचा रशियाचा अंतिम हेतु असला तरी, तूर्त कांहीं काल अंकित प्रदेशांतील कोळशाचे सांठे रशियांतच वापरण्याचें सोव्हिएट सरकारचें धोरण आहे. कारण, तसें न केल्यास, धातुकामाचे कारखाने चालविण्यासाठीं अवश्य तितकी ज्वलनशक्ति निर्माण करण्याचें सामर्थ्य त्या व्यवसायांत राहाणार नाहीं.

तेलपुरवठ्याबाबतही अशीच परिस्थिती आहे. सोव्हिएट संघराज्याचें तेलाचें आर्थिक उत्पादन ५२ दशलक्ष टनांचें आहे. यापैकीं, निम्मा पुरवठा पूर्व भागांतील खाणींतून मिळतो. या सांठ्यांत अंकित प्रदेशांच्या १२दशलक्ष टनांची भर पडते ( १२ दशलक्ष टनांत एकट्या रुमानियाचे ९ दशलक्ष टन आहेत. )

कांहीं प्रकारच्या कच्च्या मालाची तर रशियांत इतकी टंचाई आहे कीं, त्या मालाच्या पुरवठ्यासाठीं, त्याला अंकित प्रदेशांवर फार मोठ्या प्रमाणांत अवलंबून राहावें लागतें. या दृष्टीनें, बॉक्साइटचें उदाहरण अगदीं नमुनेदार आहे. पोलादाची जागा अल्युमिनिअमनें घेण्यास सुरवात केल्यापासून रशियाची ॲल्युमिनीयमची मागणी एकसारखी वाढत चालली आहे.

ही वाढती मागणी पुरविण्यासाठीं, रशियांत ॲल्युमिनिअमच्या उत्पादनांत जी वाढ होत आहे ती प्रामुख्यानें जर्मनींतून उचलून आणलेल्या ॲल्युमिनियमच्या कारखान्यांतील यंत्रसामुग्रीद्वारां होत आहे. या कारखान्यासाठीं लागणारा बॉक्साइटचा पुरवठा बहुधा हंगेरींतून होत आहे. हंगेरींतील बॉक्साइटचा सांठा सुमारें ३०० दशलक्ष टनांचा असावा असा अंदाज तज्ज्ञांनीं व्यक्त केला आहे. सोव्हिएट संघराज्यांतील बॉक्साइटच्या सांठ्यांबद्दल जे अभिप्राय मांडले गेले आहेत, त्यावरून तेथील सांठा, आणखी एका पिढीनंतर जवळ जवळ संपुष्टांत येईल असें मानण्यास जागा आहे. हंगेरींतील ॲल्युमिनिअमचें उत्पादनही गेल्या कांहीं वर्षांत बरेंच वाढलेलें आहे; तथापि, तें रशियांतील उत्पादनाच्या केवळ दशांशाइतकें आहे. असें असलें तरी, सोव्हिएट खाणींतून प्रतिवर्षी जेवढें बॉक्साइट बाहेर पडतें, तेवढेंच आज हंगेरींतील खाणींतूनही काढलें जात आहे व हंगेरीचे बॉक्साइटचे सांठे रशियाच्या सांठ्याच्या चौपटीनें मोठे आहेत.

बॉक्साइटसारखें दुसरें उदाहरण जस्त व शिसें यांचें आहे. या धातूंचा वापर आहे त्याच गतीनें होत राहिल्यास, आणखी दहा-पंधरा वर्षांचे अवधींतच रशियांतील या धातूंच्या खाणी ओस पडण्याची शक्यता आहे. या परिस्थितींत रशियाला पोलंडमधील खाणींचा फार मोठा आधार मिळणार आहे. या पोलिश खाणींतूनच इ. स. १९४३ मध्यें जर्मनीला युद्धासाठीं १ लक्ष ३० हजार टन जस्त आणि २३ हजार टन शिसें पुरविलें गेलें होतें.

सोव्हिएट साम्राज्याची विदेशी चलनाची गंगाजळी समृद्ध राखण्यासाठीं अंकित प्रदेशांतील तयार मालाकरितां योग्य बाजारपेठा शोधणें, हा सोव्हिएट योजनाकारांपुढील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

युरोपच्या बाहेरील देशांतून कच्च्या मालाची खरेदी करण्यासाठीं लागणारें परदेशी चलन, सोव्हिएट गटाला त्याच्या पश्चिम युरोपशीं असलेल्या व्यापारी संबंधांतून उपलब्ध होतें. त्यामुळें या व्यापारांत सोव्हिएट निर्यातीचें पारडें जड राखणें, रशियाला नितान्त अवश्य आहे. परंतु याबाबतच्या ताज्या प्रतिवृत्तांवरून रशियाच्या स्वतःच्या निर्यातीचें प्रमाण

हळूहळू कमी होत चाललें असल्याचें सिद्ध होत आहे. इ. स. १९५२ मध्यें सोव्हिएट गटांतून झालेल्या जादा निर्यातींत एकटचा रशियाचा निम्मा वांटा होता. परंतु लागलीच त्याच्या पुढील वर्षी रशियाचा वांटा निम्म्यावरून केवळ तेराव्या हिश्यावर घसरलेला दिसतो. रशियन निर्यातीचें प्रमाण कमी झाल्यामुळें अंकित राष्ट्रांच्या निर्यातीचें प्रमाण वाढविण्यावर भर दिला जात आहे. रुमानियाची तेलाची निर्यात १० लक्ष टनांवर नेऊन ठेवण्यांत आली आहे; आणि ती लवकरच दुपटीनें वाढेल असा रंग दिसत आहे. झेकोस्लोव्हाकिया आणि पोलंड या देशांतून निर्यात होणाऱ्या इमारती लांकडाचें प्रमाणही असेंच वाढविण्यांत आलें आहे. परंतु पोलंडच्या कोळशाच्या निर्यातीबाबत मात्र याउलट परिस्थिती आहे. परदेशी चलनाच्या प्राप्तींत पोलिश कोळशाच्या निर्यातीचा फार मोठा वांटा असला तरी त्या निर्यातीचें प्रमाण ५० टक्क्यांनीं उतरविलें गेलें आहे. कोळशाच्या निर्यातींत अशी घट होऊनही कोळशाची किंमत त्याच्या युद्धोत्तर कालांतील सर्वोच्च किंमतीच्या दोनतृतीयांशाइतकीच आहे. इ.स. १९५३ पासून अन्नधान्याच्या निर्यातीवर विशेष भर कां दिला जात आहे, याची थोडी कल्पना वरील वस्तुस्थितीवरून मिळू शकते. परंतु सोव्हिएटची परदेशी गंगाजळी तुथडी भरण्यासाठीं असल्या मार्गांचा अवलंब करणें अंकित राष्ट्रांना घातक ठरणारें आहे. तेथील जनतेच्या जीवनमानावर या धोरणाचा अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं.

सोव्हिएट व फिनलंड यांमधील व्यापारी संबंधांची माहिती विशेष उद्‌बोधक ठरणारी आहे. फिनलंडकडून युद्धजन्य नुकसानभरपाईची रक्कम वसूल झाल्यानंतर फिनीश उद्योगधंद्यांची दावण रशियन अर्थव्यवस्थेशीं बांधून टाकण्यांत आली. परंतु फिनलंडला आकर्षण वाटेल असा कोणताच माल निर्यात करणें रशियाला शक्य नसल्यामुळें रशियाला मिळणाऱ्या फिनीश मालाचे मोबदल्यांत त्या देशास पोलिश कोळशाचा आणि पूर्व जर्मनींतील व झेकोस्लोव्हाकियांतील तयार औद्योगिक मालाचा पुरवठा करण्याची व्यवस्था रशियानें केली.

सोव्हिएट गटांतील राष्ट्रांत दीर्घ काळ ओढगस्तीची आर्थिक

परिस्थिती असूनही, त्यांचें आर्थिक दृष्ट्या एकीकरण घडवून आणण्यांत, केंद्रीय नियोजन पद्धतीस निःसंशय फार मोठें यश प्राप्त झालेलें आहे. या केंद्रीय योजनेनें, सबंध सोव्हिएटसाठीं, उत्पादनाचा ताळेबंद निश्चित आंखून दिला आहे. त्या आंखीव कार्यक्रमाशीं सुसंगत असा आपापल्या उत्पादन-शक्तींचा विकास घडवून आणण्याचा आदेश सोव्हिएट मंडळांतील प्रत्येक घटक राष्ट्रांस दिला गेला आहे. या आदेशानुसार आपल्या गरजा भागून कांहीं शिल्लक उरेल इतकें उत्पादन करण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रावर येऊन पडलेली आहे.

प्रारंभीं कांहीं काल अंकित राष्ट्रगटांतील कांहीं घटकांच्या व तेथील पुढाऱ्यांच्या संपूर्ण आज्ञांकिततेबद्दल सोव्हिएट नेत्यांना खात्री वाटत नव्हती. त्यावेळीं निरनिराळ्या घटकांत खूप घनिष्ट असे आर्थिक व राजकीय संबंध उत्पन्न व्हावेत या गोष्टीस रशियाचा तीव्र विरोध होता. आतां तो विरोध जवळ जवळ मावळलेला आहे.

निरनिराळ्या विभागांतील विकासकार्यांत सुसंवादित्व राहावें यासाठीं शास्त्रीय व तांत्रिक क्षेत्रांत काम करणाऱ्या संयुक्त समित्यांची नियुक्ती करण्यांत आली आहे. उत्पादनाच्या प्रत्येक अवस्थेंत श्रमविभागाच्या तत्त्वावर भर देण्यांत आला आहे. अल्युमिनियमच्या धंद्यामुळें झेकोस्लाव्हिया आणि हंगेरी, तसेंच पोलंड व हंगेरी या देशांमध्यें प्रत्यक्ष संबंध निर्माण झाले आहेत. रुमानिया आणि हंगेरी या देशांनीं रासायनिक उत्पादनासाठीं परस्परांत हातमिळवणी केली आहे. या उत्पादनासाठीं जळण म्हणून रुमानियां-तील तेलखाणींतून मिळणाऱ्या ज्वालाग्राही वायूंचा उपयोग केला जातो. सोव्हिएट राष्ट्रमंडळांतील भिन्न घटकांनीं एकत्र येऊन, सोव्हिएट अंकित प्रदेशासाठीं विजेचा पुरवठा करण्याची जबाबदारी पत्करलेली आहे. सोव्हिएट प्रदेशांतील पोलाद कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाचें योग्य विभाजन व्हावें, यासाठीं रशिया आणि अंकित राष्ट्रें यांनीं परस्परसाहाय्यानें एक वांटपकेंद्र उघडलें आहे.

या एकत्रीकरणाच्या योजनेचें एक वैशिष्टय ठळकपणें डोळ्यांत भरतें. या योजनेमुळें मूलभूत महत्त्वाच्या व्यवसायांत ठराविक पद्धतीनें विस्तार

घडवून आणला आहे. या व्यवसायांत वापरण्यांत आलेल्या यंत्रसामुग्रीच्या दुरुस्तीसाठीं एकाच केंद्राची स्थापना केली गेली आहे. अशा रीतीनें सर्व प्रदेशांत ठराविक प्रकारच्या संस्था आणि पद्धती प्रस्थापित होत आहेत.

रेल्वे, रस्ते आणि जलवाहतुक यांच्या विकासाच्या कित्येक महत्त्वाकांक्षी योजना पुरेशा भांडवलाचे अभावीं तूर्त स्थगित केल्या गेल्या असल्या तरी त्यांची आंखणी पूर्व-पश्चिम विभागांतील परस्पर-दळणवळण सुलभ व वृद्धिगत व्हावें या दृष्टीनें कांटेकोरपणें करण्यांत आली आहे.

संपूर्ण सोव्हिएट प्रदेशासाठीं रेल्वेवहातुकीचे दर आणि इतर नियम समान ठेवण्यांत आलेले आहेत. बर्नच्या आंतरराष्ट्रीय परिषदेंत संमत झालेले निर्णय, सोव्हिएटमधील नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेस आणि जनताप्रधान लोकशाहीच्या वाढीस पोषक नाहींत, असें ठरविण्यांत आलें आहे.

व्यापारी व औद्योगिक संबंधांत सोव्हिएट मंडळांतील घटकांना अशा रीतीनें अनेक प्रकारें एकत्र आणलें गेलें असलें, तरी सोव्हिएट साम्राज्याचें खरें संघटन वेगळ्याच गोष्टीवर अवलंबून आहे. साधनसामुग्रीच्या एकत्रीकरणापेक्षां मनुष्यबळाच्या एकत्रीकरणामुळें तें घडून आलेलें आहे. आर्थिक क्षेत्रांत, अंमलबजावणी खात्यांतील महत्त्वाच्या हुद्यांच्या जागांवर, सर्वत्र रशियन तज्ज्ञांची नेमणूक करण्यांत आली आहे. इतकेंच नव्हे तर, धातुकामाच्या व्यवसायांत, रासायनिक उत्पादनाचे क्षेत्रांत आणि यंत्रोत्पादानाचे धंद्यांत, जवळ जवळ प्रत्येक कारखान्याची व्यवस्था रशियन तज्ज्ञांचे देखरेखीखालीं केली जाते. या धोरणामुळें केवळ दहा वर्षांचे अवधींत रशियामध्यें सोव्हिएटच्या आर्थिक साम्राज्याचा गाडा हांकणाऱ्या तज्ज्ञ प्रशासकांचा एक खास वर्ग निर्माण झाला आहे. सोव्हिएट हितसंबंधांचे संरक्षक म्हणून, त्यांना कित्येक जादा अधिकार बहाल करण्यांत आले आहेत.

## सोव्हिएट व अंकित प्रदेश यांमधील व्यापारी देवघेव

हातीं असलेली आंकडेवारी कितपत विश्वसनीय आहे हा प्रश्न बाजूस ठेवून अभ्यास केल्यास मध्य युरोपांतील अंकित देशाचा जवळ जवळ ७० ते ८० टक्के परदेशी व्यापार सोव्हिएट साम्राज्यांतच चालत असल्याचें सिद्ध

होतें. या परिस्थितीमुळें त्या देशांच्या सोव्हिएट साम्राज्याबाहेरील जगताशीं होऊं शकणाऱ्या व्यापाराची व्याप्ती कशी मर्यादित झालेली आहे, त्याचीही कल्पना वरील अभ्यासांतून आपोआप येऊं शकते.

पूर्व युरोपांतील सोव्हिएटचे तीन अंकित देश, रुमानिया, बल्गेरिया आणि आल्बेनिया हे, निम्मा वांटा देतात. मध्य युरोपांतील झेकोस्लोव्हाकिया, पोलंड व हंगेरी या तीन देशांबाबत हें प्रमाण थोडें कमी आहे. तें ५० टक्क्यांऐवजीं ३५ ते ४०टक्क्यांपर्यंतच आहे.परंतु,पुन्हां जर्मनीला मात्र आपल्या निर्यात मालापैकीं ५० टक्के भाग रशियालाच विकावा लागतो. सोव्हिएटनें प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार इ. सन १९५३ मधील सोव्हिएट संघराज्याचा परराष्ट्रीय व्यापार, त्यांच्या युद्धपूर्वकालीन पातळीच्या चौपटीनें वृद्धिंगत झाला आहे, असें प्रकट होतें. चलनांत हिशेब केल्यास, ही वाढ सुमारें २३ दशलक्ष रूबल इतकी आहे. या वाढीपैकीं ८५ टक्के वाढ ही अंकित प्रदेशांबरोबर होणाऱ्या देवघेवीचे व्यवहारामुळें घडून आलेली आहे. यावरून असा अंदाज करतां येईल कीं, सोव्हिएट व अंकित प्रदेश यांची इ. स.१९५३ मधील व्यापारी उलाढाल २० दशलक्ष रूबलची आहे. अर्थात् सोव्हिएट संघराज्यांत आयात होणाऱ्या वस्तूंची नेमकी किंमत कशी ठरवावयाची हा प्रश्न अद्याप अनिर्णितच आहे.

सोव्हिएटनें अधिकृतरीत्या ठरवून दिलेल्या किंमत-मापनपद्धतीची जागतिक किंमतीशीं कांहीं सांगड घालणें शक्य आहे काय ? पश्चिमी राष्ट्रें त्यांच्या सोव्हिएट मंडळांतील राष्ट्रांशीं होणाऱ्या व्यापाऱ्याची आंकडेवारी नित्य प्रसिद्ध करीत असतात; तसेंच सोव्हिएट मंडळांतील राष्ट्रें आपल्या एकूण परराष्ट्रीय व्यापारांत सोव्हिएट बाह्य जगताशीं होणाऱ्या व्यापाराचें टक्केवारी प्रमाण जाहीर करीत असतात. परंतु ही टक्केवारी अजमावतांना कोणत्या किंमती प्रमाण मानून हिशेब केला जातो हें कांहीं समजून येत नाहीं; त्यामुळें वरील दोन ठिकाणांहून येणाऱ्या भिन्न भिन्न आंकडेवारींची तुलना करणें कठीण होऊन बसतें.

सोव्हिएट संघराज्य आणि त्याचे अंकित प्रदेश, यांमधील देवघेवीच्या व्यवहारांचा हिशोब कोणत्याही किंमती प्रमाण धरून केला तरी, त्यांच्या

परस्परांतील आयात-निर्यात व्यापारांत समतोलपणा असल्याचेंच आढळून येतें. तथापि आपण आपल्या अंकित राष्ट्रांना कर्जरूपानें भांडवलाचा पुरवठा करीत असतों असा रशियाचा दावा आहे. अशा तऱ्हेच्या कर्जांतील मोठा वांटा पोलंडकडे जात असतो. या कर्जव्यवस्थेचा सोव्हिएट-पोलिश व्यापारावर कसा परिणाम होतो तो अभ्यासपूर्वक पाहण्याजोगा आहे.

⁓ ⁓ ⁓ ⁓

पोलिश-सोव्हिएट व्यापार दुहेरी मार्गानें चालतो. एकामुळें पोलंडला रशियाकडून निरनिराळ्या प्रकारचा कच्चा माल मिळतो आणि त्याचे मोबदल्यांत पोलंडमधील कच्चा माल रशियांत रवाना होतो. दुसऱ्यामुळें रशियांतून पोलंडकडे उत्पादनसामुग्रीची निर्यात होते हा व्यवहार उधारीचा असतो. पांच वर्षांचे मुदतींत पोलंडनें या मालाची किंमत रशियास द्यावयाची असते. या कर्जबाजारीपणामुळें पोलंडचें बरेंच नुकसान होतें. आपल्या एकूण उत्पादनांतील महत्त्वाच्या भागास पोलंडला प्रतिवर्षी मुकावें लागतें यंत्रें, अवजारें, हत्यारें, वाहतुकीचीं साधनें, कोळसा इत्यादि अनेक वस्तू पुरवून पोलंडला रशियाची कर्जफेड करावी लागते. पोलीश-सोव्हिएट व्यापारासंबंधीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आंकडेवारीचा अभ्यास केल्यास, पुढील गोष्टी ध्यानांत येतात.—पहिल्या मार्गानें होणारी उलाढाल उभयपक्षीं सुमारें १५० दशलक्ष डॉलर्सची असते; दुसऱ्या मार्गानें सोव्हिएटमधून रवाना होणाऱ्या भांडवली सामुग्रीची किंमत सुमारें १२० दशलक्ष डॉलर्स इतकी असते; पोलंडकडून हप्त्याहप्त्यानें होणाऱ्या परतफेडीचा हिशेब प्रतिवर्षीं ६० दशलक्ष डॉलर्सचा असतो. वरील आंकडे इ. सन १९५३ मधील आहेत. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या प्रतिवृत्तांवरून पोलंडच्या व्यापारी ताळेबंदांतील तुटीचें प्रमाण वेगानें कमी होत असल्याचें दिसतें. सोव्हिएटकडून, इतर देशांना पतीवर मिळणारी सामुग्री किती तोकडी असते, याचा सोव्हिएट-चीन व्यापारी संबंधांत पुन्हां प्रत्यय येतो. इ. स. १९५० ते १९५४ च्या दरम्यान चीन व रशिया यांच्यांत व्यापारी संबंधांचे जे करार एकामागून एक संमत झाले त्या सर्व करारांन्वयें मिळून चीनला रशियाकडून एकूण ४२० दशलक्ष डॉलर्स किंमतीच्या सामुग्रीच्या पुरवठ्याचें आश्वासन मिळालें. ही सामुग्री

बऱ्याच वर्षांच्या कालावधींत उपलब्ध व्हावयाची होती. यापूर्वीं इ. स. १९२८ ते १९३० या जागतिक मंदीपूर्वींच्या तीन वर्षांच्या कालांत चीनला ३०० दशलक्ष डॉलर्सचें कर्ज मिळालें होतें. आणि त्यामुळें त्या देशास उपभोग्य वस्तूंच्या पुरवठ्यांत येणारा तुटवडा भरून काढतां आला होता. त्या वेळच्या डॉलरच्या किंमतींत आतां खूपच बदल झालेला आहे ही आणखी एक बाब जमेस धरून वरील दोन रकमांचा विचार केल्यास रशियानें देऊं केलेलें कर्ज किती तोकडें आहे हें सहज ध्यानांत येतें. आणि चीननें तूर्त आंखलेल्या औद्योगिकरणाच्या महत्त्वाकांक्षी योजनांच्या पार्श्वभूमीवर वरील विचार केला तर, त्याचें आत्यंतिक अपुरेपण विशेषच जाणवतें. चीनच्या विकास योजनांसाठीं आवश्यक तें साहाय्य पुरविण्याचा बराचसा भार, खुद्द रशियास पेलणें अशक्य आहे, असें ठरवून रशियानें तें ओझें आपल्या अंकित प्रदेशांचे माथ्यावर टाकून देण्याचें धोरण अंगिकारलें आहे. पूर्व जर्मनींतून आणि झेकोस्लोव्हाकियांतून चीनला सर्व प्रकारच्या सामुग्रीचा पुरवठा, यापूर्वींच होऊं लागला आहे. हंगेरी व पोलंड यांमधूनही चीनमध्यें कांहीं आयात होते. त्याशिवाय, पोलंडला त्याच्या व्यापारी नौकादलांतील दोनतृतीयांशापेक्षां अधिक जहाजें चिनी मालवहातुकीचे कारणीं लावावीं लागत आहेत. स्टालिनच्या मृत्यूनंतर चीनची प्रतिष्ठा वाढूं लागली आहे; त्यामुळें रशियन मुत्सद्यांना अतिपूर्वेंतील या सामर्थ्यशाली मित्रराष्ट्राची मर्जी राखण्याची सतत चिंता लागलेली असते. त्यासाठीं पूर्व युरोपांतील आपल्या अंकित राष्ट्रांवर कोणतेंही ओझें लादण्यास रशियन नेते मागेंपुढें पाहात नाहींत.

चीन-रशिया व अंकित प्रदेश यांच्या परस्परांतील व्यापारी संबंधांत एक गोष्ट ठळकपणें प्रतिबिंबित झालेली दिसते. ती म्हणजे कम्युनिस्ट प्रदेशाची प्रचंड भांडवली भूक आणि त्यामुळें सतत जाणवणारी रशियन भांडवलाची तीव्र टंचाई, ही होय.

डॉक्टर नॉर्मन कॅप्लन यांनीं सोव्हिएट रशिया व अमेरिका या दोन देशांच्या आर्थिक विकासाचे कालांतील भांडवली खर्चाची तुलनात्मक छाननी केलेली आहे. त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणें आहेत.

(अ) इ. सन १९३६ पासून भांडवली खर्चाचा मोठा भाग लष्करी

कार्यक्रमासाठीं व्यतीत होत आहे. (ब) रशियाच्या राष्ट्रीय उत्पन्नाची पातळी तुलनेनें खालीं आहे. याचा अर्थ, जनतेचें राहणीमान टिकवून धरण्यासाठीं त्यांची बरीचशी सामुग्री खर्च होत आहे. (क) सोव्हिएटमधील गुंतवणींत परकीय देशांचा वांटा अत्यंत क्षुल्लक आहे. याउलट अमेरिकेनें आपल्या विकासासाठीं परदेशांत मोठमोठीं कर्जे उभारलीं होतीं.

ऐतिहासिक दृष्टि असलेला निःपक्षपाती अभ्यासक या सर्व माहितीवरून एकच सार काढण्याची शक्यता आहे. तें म्हणजे, रशियाकडून त्याच्या ंकित प्रदेशांचें निर्घृण शोषण प्राधान्येंकरून, त्याच्या प्रचंड भांडवली भुकेमुळेंच होत असलें पाहिजे.

◆◆ ◆◆ ◆◆ ◆◆

आजमितीस रशियाकडून अंकित प्रदेशांची कितपत पिळवणूक होत आहे याचें स्पष्ट आकलन हातीं असलेल्या अपुऱ्या माहितीवरून होणें कठिण आहे. त्या उभयतांतील व्यापारासंबंधींची आंकडेवारी संपूर्णपणें उपलब्ध झाल्याशिवाय, परस्परांतील व्यापारी अटींचा खरा अर्थ ध्यानीं येणार नाहीं. आणि उद्यां या व्यापारी अटींबद्दल सर्व माहिती जाहीर झाली तरी, अंकित प्रदेशांवरील प्रभुत्वामुळें रशियाचा एकूण किती लाभ होत आहे याची केवळ अंशतःच कल्पना आपणांस येऊ शकेल. इतकेंच नव्हे तर, परस्परांतील एकूण व्यापाराच्या आंकड्यांची तुलना केल्यानें, आपल्या डोळ्यापुढें सोव्हिएटच्या फायद्याचें स्पष्ट चित्र उभें राहूं शकेल, अशी नुसती आशा बाळगणें देखील व्यर्थ आहे. सोव्हिएट आयातींचें सोव्हिएटच्या राष्ट्रीय उत्पन्नाशीं प्रमाण एक-दोन टक्क्यांपेक्षां अधिक नाहीं, असेंच, आपण काळजीपूर्वक जमा केलेल्या माहितीवरूनही दिसून येईल.

त्यामुळें सोव्हिएटच्या एकूण आर्थिक लाभाचा अंदाज घ्यावयाचा असेल तर, अंकित प्रदेशांशीं असलेल्या त्याच्या संबंधांतील कांहीं विशिष्ट पैलूंचाच अभ्यास करणें अधिक इष्ट आहे.

आर्थिक विकासाच्या नित्यपरिचित रचनेनुसार, सोव्हिएट प्रदेशांतील औद्योगिकरणाच्या कार्यक्रमांत, लोखंड व पोलाद यांच्या उत्पादनवाढीवर विशेष भर देण्यांत आला आहे. सोव्हिएट प्रदेशांत लोखंड व पोलाद यांच्या

धंद्यासाठीं लागणाऱ्या कित्येक मूलद्रव्यांचा तुटवडा आहे ही वस्तुस्थिती ध्यानांत न घेतांच बल्गेरियाखेरीज प्रत्येक अंकित देशांत लोखंड-पोलादाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. निरनिराळ्या भव्य आणि अति खर्चिक योजना आंखून, इ. सन. १९३७ मध्यें ६ दशलक्ष टनांवर असलेलें त्यांचे पोलाद-उत्पादन आतां १४ दशलक्ष टनांवर खेंचून नेण्यांत आलें आहे. आणखीही कांहीं नवीन योजना अगदीं नजीकच्या भविष्यकालांतच पूर्ण होत आहेत. त्यानंतर तेथील पोलादाचें उत्पादन १६ दशलक्ष टनांवर जाईल.

इ. सन. १९५३ मध्यें खुद्द सोव्हिएट संघराज्याचें पोलादाचें उत्पादन ३८ दशलक्ष टनांचें होतें. त्यापैकीं निम्म्यापेक्षां अधिक उत्पादन पूर्व भागांतील कारखान्यांत घडून आलें होतें, ही गोष्ट विशेषत्वानें नमूद करण्याजोगी आहे. तसेंच पूर्व भागांतील उत्पादनाचें प्रमाण दिवसानुदिवस सारखें वाढत जात आहे, ही गोष्ट देखील विसरून चालण्याजोगें नाहीं.

इ. सन १९४१ मध्यें सोव्हिएट संघराज्याचा जो प्रदेश शत्रुराष्ट्रांनीं व्यापलेला नव्हता, त्या भागांतील कारखान्यांत ८ दशलक्ष टन पोलादाचें उत्पादन होत असे; त्यापैकीं सुमारें ६ ते ६॥ दशलक्ष टनांचा वापर युद्ध-प्रयत्नांचे कामीं केला जाई. युद्ध संपून रशियाचे पश्चिम प्रदेश मुक्त होईपर्यंत या उत्पादनांत निम्म्यानेंही वाढ होऊं शकली नव्हती. सोव्हिएटच्या अंकित प्रदेशांत आज जितकें पोलादाचें उत्पादन आहे, तेवढेंच पोलाद रशियाला युद्धाच्या ऐन धामधुमीच्या कालांत उपलब्ध होऊं शकत होतें. आणि युद्धाच्या प्रारंभीं तर रशियाचें पोलादाचें उत्पादन त्याहीपेक्षां कमी होतें. आज अंकित प्रदेशांत जो उत्पादनविस्तार घडवून आणण्याच्या रशियाच्या योजना आहेत त्याच्या निम्मे पोलादही त्यावेळीं रशियांत निर्माण होत नव्हतें.

सोव्हिएटच्या औद्योगिकरणाचे कार्यक्रमांत यंत्रोत्पादनावर विशेष भर देण्यांत आलेला आहे. युद्धकालांत झेकोस्लोव्हाकियानें या क्षेत्रांत जी प्रगती केली त्यामुळें तो देश यंत्रोत्पादनाबाबत आज आघाडीवर आहे. इ. सन १९५० मधील त्याचें यंत्रोत्पादन युद्धपूर्वकालीन उत्पादनाच्या दुपटीपेक्षां जास्त होतें. युद्धापूर्वी जर्मनीच्या एकूण यंत्रोत्पादनांत पूर्व

जर्मनींतील कारखान्यांचा २५ ते ३३ टक्के भाग असे. त्या भागावर आतां सोव्हिएटचें प्रभुत्व असून, तेथील यंत्रोत्पादनानें इ. सन १९५० चे सुमारास आपली युद्धपूर्व पातळी पुन्हां गांठली आहे. एवढेंच नव्हे, तर त्या उत्पादनांत आतां झपाट्यानें वाढ होऊं लागली आहे. हें उत्पादन पूर्वीप्रमाणें केवळ सूक्ष्म यंत्रें अथवा प्रकाश-यंत्रें यांचेपुरतेंच मर्यादित राहिलेलें नसून त्यांत आतां अवजड यंत्रांचाही समावेश होऊं लागलेला आहे. हंगेरी व पोलंड या देशांनींही अलिकडे अवजड धंद्याचे विस्तारावर आपलें लक्ष केंद्रित करण्यास सुरवात केली आहे. सोव्हिएट मंडळांत हंगेरी हें विद्युत्-उपकरणांची निर्मिती करणारें प्रमुख राष्ट्र म्हणून ओळखलें जाऊं लागलें आहे. पोलंडनें रेल्वेवाहतुकीच्या साधनांच्या निर्मितीची जबाबदारी उचललेली आहे. तेथील रेल्वेच्या डब्यांचें वार्षिक उत्पादन १७ ते १८ हजारांचे घरांत गेल्यानें मालडबे निर्माण करण्यांत पोलंड हें सबंध युरोपांत अग्रेसर राष्ट्र ठरलें आहे. याचबरोबर तेथील जहाज-बांधणी कारखान्यांची वाढ होऊन तेथें ५ हजार टनी जहाजें तयार होऊं लागलीं आहेत. युरोपीय आर्थिक समितीनें केलेल्या पाहणीनुसार इ. स. १९५१ चे सुमारास सोव्हिएटच्या अंकित प्रदेशांचें इंजिनीअरिंग धंद्यांतील उत्पादन तेथील युद्धपूर्वकालीन उत्पादनाच्या दुपटीनें वाढलें असल्याचें आढळून आलें. इ. स. १९५३ पासून या उत्पादनाची गती कांहींशी मंदावली आहे. तथापि आजमितीसही त्या उत्पादनाची किंमत ५ ते ६ हजार दशलक्ष डॉलरचे घरांत जाणारी आहे. या धंद्यांत प्रत्येक कामगारागणिक सुमारें ३००० डॉलर किंमतीची यंत्रसामुग्री अवश्य असते असें गृहीत धरल्यास या व्यवसायांत प्रतिवर्षीं ५ लक्ष नवीन कामगारांची आवक करण्यासाठीं लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची किंमत १५०० दशलक्ष डॉलरपेक्षां अधिक असणार नाहीं. त्याशिवाय जुन्या यंत्रांचे जागीं नवीं यंत्रें बसविण्यासाठीं किंवा सुट्या भागांची अदलाबदल करण्यासाठीं लागणाऱ्या सामुग्रीची किंमत जमेस धरली तरी अंकित प्रदेशांतील एकूण यंत्रोत्पादनापैकीं निम्मी सामुग्री शिल्लकच राहाते. या सामुग्रीचा वापर लष्करी उपयोगासाठीं वा निर्यातीसाठीं करणें शक्य असतें. परंतु सोव्हिएट जगताबाहेर होणाऱ्या यंत्रनिर्यातीची किंमत ५० दशलक्ष डॉलरपेक्षां अधिक नाहीं.

याचा अर्थ उर्वरित प्रचंड सामुग्रीचा वापर एकतर सोव्हिएट संघराज्यांत अथवा आशियांतील चीन, उत्तर कोरिया आणि अलिकडे व्हिएटनाम यासारख्या कम्युनिस्ट राष्ट्रांत होत असला पाहिजे हें उघड आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर झेकोस्लोव्हाकिया, पोलंड आणि पूर्व जर्मनी या राष्ट्रांतून सोव्हिएट संघराज्यास यंत्रसामुग्रीचा पुरवठा प्रचंड प्रमाणांत होऊं लागलेला असल्याची प्रांजल कबुली, कधीं नव्हे ती नुकतीच एका सोव्हिएट प्रवक्त्यानें दिलेली आहे.

मध्य व पूर्व युरोपांतील देशांच्या आर्थिक एकीकरणांतून सोव्हिएट संघराज्यानें साध्य केलेली सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे यंत्रोत्पादनांतील प्रचंड वाढ ही होय.

त्याशिवाय उपभोग्य वस्तूंचे उत्पादनाबाबतही या एकीकरणामुळें रशियाचा बराच लाभ झाला आहे. कापडाच्या आयातीवर अवलंबून राहाण्याचें रशियाचें धोरण अंकित प्रदेशांतील कापडधंद्यांत मोठ्या प्रमाणांत भांडवल गुंतविलें गेल्यामुळेंच शक्य झालें आहे. याबाबत इ. स. १९५१ मधील परिस्थिती पुढीलप्रमाणें होती. मध्य युरोपांतील चार देशांच्या कापडधंद्यांत दर १५ रहिवाश्यांमागें एक सूतकताई-यंत्र पडत होतें तर खुद्द रशियांत दर २५ माणसांगणिक एका यंत्राची व्यवस्था होती. त्यानंतर वरील अंकित प्रदेशांत सोव्हिएटमधून येणाऱ्या कापसाचा वापर करण्यासाठीं आणखी नवीं यंत्रें बसविण्यांत आलीं आहेत.

सोव्हिएट मंडळांतील सर्व राष्ट्रांच्या साखर कारखान्यांचें एकूण उत्पादन वार्षिक ३३ लक्ष टनांचें आहे तर खुद्द सोव्हिएटचें साखरेचें उत्पादन ३६ लक्ष टनांचें आहे. पोलंड, झेकोस्लोव्हाकिया आणि पूर्व जर्मनी हे देश युरोपांतील साखरेचे उत्पादक आहेत. त्या तिघांचें मिळून वार्षिक उत्पादन २६ लक्ष टनांचें आहे. (–किंवा दरडोई दरसाल ४० किलोग्राम.) त्यापैकीं १० लक्ष टन साखरेची सोव्हिएटला निर्यात होते असें विश्वसनीयरीत्या म्हणतां येतें.

अंकित प्रदेशांतील साधनसामुग्री ही वस्तुत: आपलीच मालमत्ता आहे असें मानण्याची रशियाची पद्धत आहे. त्यामुळें, अंकित प्रदेशांतील उत्पादनावर होणाऱ्या वास्तविक खर्चास रशियाचे दृष्टीनें बरेंच महत्त्व आहे. उत्पादनाचे कामीं लागलेल्या मानवी श्रमांची मोजदाद करून उत्पादनाच्या वास्तविक खर्चाचे हिशेब करण्याचें शिक्षण मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञांना मिळालेलें असतें. भांडवलशाही रचनेच्या मार्क्सप्रणित विवेचनानुसार हे हिशेब कामगारांच्या जीवनवेतनाच्या कल्पनेवर आधारले जातात. सोव्हिएट धर्तीच्या अर्थव्यवस्थेसही हिशेबाची वरील पद्धत सहज लागू करतां येते. आणि सोव्हिएट अर्थशास्त्रज्ञ अशा प्रकारें, हिशेब करून योजना आंखण्याचे कामीं चांगलेच तरबेज आहेत, असें सोव्हिएटमधील एका प्रमुख अधिकारी व्यक्तीचें म्हणणें आहे.

उत्पादन खालच्या पायरीवरून वरच्या पायरीवर जाऊं लागलें, म्हणजे, उत्पादनासाठीं योजलेल्या मानवी श्रमसंख्येची वाढ उत्पादनवाढीचे प्रमाणांत होत नाहीं. तयार वस्तूंचे उत्पादनाच्या प्राथमिक अवस्थेंत वास्तविक उत्पादनखर्चाची काय पातळी राहाते या गोष्टीचें रशियास विशेष महत्व वाटतें.

खालील पत्रकांत मानवी श्रमघटकांच्या वास्तविक खर्चाचे तुलनात्मक आंकडे दिलेले आहेत. ही तुलना इ. स. १९३८ आणि इ. स. १९५३ या दोन वर्षांतील आंकडयांची आहे. वास्तविक खर्चाचा हिशेब ताशीं वेतनाचे भाषेंत मांडलेला आहे.

| देश. | राहणीच्या खर्चाचा निर्देशांक सप्टें. ते नोव्हें. १९५३ १९३८ = १०० | दरताशीं–वेतन ( राष्ट्रीय चलनांत ) युद्धपूर्व (१९३८) | इ. स. १९५३ | वेतनाचा निर्देशांक इ. स. १९५३ १९३८ = १०० | पैशांतील वास्तविक |
|---|---|---|---|---|---|
| झेकोस्लोव्हाकिया | १४० | ५·५ | ५·०० | ९० | ६४ |
| पूर्व जर्मनी | २०५ | ०·८० | १·३० | १६२ | ७५ |
| हंगेरी | १,२२० | ०·४९ | ४·०० | ८१० | ६६ |
| पोलंड | २,०२५ | ०·७८ | ३·५० | ४४९ | ४३ |

e216

(टीपः—राहणीच्या खर्चाचे निर्देशांक 'इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ युरोप' या समितीनें प्रसिद्ध केलेल्या प्रतिवृत्तावरून घेतलेले आहेत. याला फक्त हंगेरीचा अपवाद आहे. कारण वरील प्रतिवृत्तांत हंगेरीमध्यें युद्धोत्तर काळांत झालेल्या बदलांचें यथार्थ दिग्दर्शन झालेलें नाहीं, असें लेखकाचें मत आहे.)

कोणत्याही दोन देशांतील वास्तविक वेतनांची तुलना करतांना अनेक प्रकारच्या अडचणी उपस्थित होतात आणि त्यामुळें अशा प्रकारची तुलना फार सदोष असते. दोन देशांतील उपभोग्य वस्तूंचे मागणींत असलेले फरक या दोषास प्रामुख्यानें कारणीभूत असतात. त्याशिवाय सोव्हिएट मंडळांतील देशांच्या परिस्थितीची तुलना तुटपुंज्या माहितीच्या आधारावरच करावी लागते. तथापि, सोव्हिएट संघराज्य आणि त्याचे अंकित प्रदेश यांमधील परिस्थितीची स्थूलमानानें तुलना करण्याचा प्रयत्न पुढील तक्त्यांत केला आहे.

१९५३ उन्हाळा

| | १<br>सोव्हिएट संघराज्य | २<br>झेकोस्लोव्हाकिया | ३<br>पोलंड | ४<br>हंगेरी | ५<br>पूर्व जर्मनी |
|---|---|---|---|---|---|
| अन्नपेटिकांचा दरडोई वार्षिक उपभोगाचा खर्च (राष्ट्रीय चलनांत) | १,५२५ | २,४७० | २,५७० | ३,२३० | ८२५*<br>३५५✦ |
| दरताशीं सरासरी वेतन | ३·५० | ५·०० | ३·५० | ४·०० | १·३० |
| अन्नपेटिकेची कामाचे तासांत किंमत | ४३६ | ४९४ | ७३३ | ८०० | ६४२*<br>२७३✦ |
| अन्नपेटिकांच्या किंमतीवरून वास्तविक वेतन | १०० | ८८ | ६२ | ५४ | ६८*<br>१५९✦ |

(टीप—एका अन्नपेटिकेंत २०० कि. ग्रॅ. ब्रेड, ५० कि. ग्रॅ. पीठ, १५० कि. ग्रॅ. बटाटे, १५ कि. ग्रॅ. साखर, १७ कि. ग्रॅ. मांस, ५० अंडीं

यांचा समावेश होतो. पूर्व जर्मनीसाठीं * खुल्या बाजारांतील किंमती दर्शवितें. ✦ नियंत्रित किंमती दर्शवितें.)

जे देश आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाविषयीं आणि लोकांच्या राहणीमानाविषयीं सविस्तर माहिती प्रसिद्ध करीत नाहींत त्या देशांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठीं अन्नपेटिकांचे भाषेंत हिशेब करण्याची पद्धतच बहुशः अवलंबिली जाते. (पाहा–" मॅलेन्कॉव्हचे राजवटींतील राहणीमान." सप्टेंबर १९५३ च्या ' दि ट्वेंटिएथ सेंचरी 'मधील लेख.)

वरील आंकडेवारीवरून स्थूलमानानें खालील निष्कर्ष काढतां येतील.

इ. स. १९४५ ते १९५३ चे दरम्यान अंकित प्रदेशांपैकीं आर्थिक दृष्टचा पुढारलेल्या देशांतील वास्तविक-वेतनाची पातळी हळूहळू खालावत गेली. इ. सन १९५३ मध्यें ती युद्धपूर्वकालीन वेतनाच्या दोनपंचमांशाइतकी खालीं आली होती. अर्थात त्यामुळें त्या देशांतील राहणीचा दर्जा उतरला असें नव्हे. कारण वेतनाचे दर कमी झाले तरी कुटुंबप्रमुखांना पूर्वींपेक्षां अधिक काम मिळण्याची तरतूद झाल्यामुळें कुटुंबाच्या एकूण उत्पन्नांत वाढच झाल्याचें दिसून येत होतें. तसेंच कुटुंबांतील इतर घटकांनाही काम मिळण्याची सोय झाल्यामुळें कुटुंबाच्या उत्पन्नांत भर पडत होती. ( अंकित प्रदेशांतील कम्युनिस्ट सरकारांचें धोरण जास्तीत जास्त स्त्री-पुरुषांना कामधंदा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करतें. ) कुटुंबाच्या उत्पन्नांत अशा रीतीनें वाढ झालीं तरी त्यामुळें त्यांना कामधंदा पुरविणाऱ्या सरकारच्या दरडोई खर्चाचे प्रमाणांत कांहीं बदल होत नाहीं.

सोव्हिएट मंडळांतील प्रगत राष्ट्रांत युद्धाचे पूर्वी वास्तविक वेतनाची श्रेणी सोव्हिएट संघराज्यांतील वेतनश्रेणीपेक्षां दुपटीनें अधिक होती. परंतु युद्ध व युद्धोत्तर घटना यांचा परिणाम होऊन या दोन वेतनश्रेणींतील अंतर एकसारखें वाढत गेलें. युद्ध संपून आतां स्थिरस्थावर झाली आहे. या तिसऱ्या अवस्थेंत तर वरील दोन ठिकाणच्या वेतनश्रेणीचें जुनें रूप आतां पार बदलून गेलें आहे. सोव्हिएटमधील वास्तविक वेतनाचे दर आज चढणीवर आहेत, तर अंकित प्रदेशांत त्यांना घसरगुंडी लागलेली आहे. इ. सन १९५२ मध्यें झेक आणि पूर्व

जर्मनी यांतील वेतनाचे दर साधारणपणें सोव्हिएटमधील दरांशीं जुळणारे आहेत तर पोलंड आणि हंगेरी यांमधील दर सोव्हिएट दरांच्या तीन-पंचमांशाइतकेच आहेत.

इ. सन १९५३ पासून अंकित प्रदेशांतील घसरत्या वेतनश्रेणी सांवरून धरणें हें नवीन आर्थिक धोरणाचें महत्त्वाचें अंग आहे, असें प्रसिद्ध केलें गेलें आहे. औद्योगिक कामगारांच्या उत्पादनक्षमतेंत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न सपशेल फसले आहेत. ( उदा. पोलंडमधील खाणींचें दरडोई उत्पादन आज युद्धपूर्वकालीन उत्पादनाच्या केवळ दोनतृतीयांशाइतकेंच आहे. ) उपलब्ध मनुष्यबळाचा संपूर्ण वापर होऊं लागल्यामुळें आतां यापुढें दरडोई उत्पादन वाढविणेसच विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. कारण एकूण उत्पादन वृद्धिंगत करण्यासाठीं तोच एक मार्ग तूर्त शिल्लक राहिला आहे. कामगारांची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठीं त्यांना कांहीं सोयी-सवलती देणें अवश्य झालें आहे. त्याशिवाय औद्योगिकरणाचा वेग आणि त्याच्या रचनेंतील गुंतागुंत यामुळें कित्येक क्षेत्रांत आजच विलक्षण टंचाईची परिस्थिती उत्पन्न झाली आहे. त्यामुळें औद्योगिकरणाच्या निरनिराळ्या योजनांत निदान कांहीं काल तरी थोडी कपात करणें प्राप्त आहे. कांहीं योजना तूर्त स्थगित कराव्या लागतील, कांहींच्या वेळापत्रकांत ढिलाई ठेवावी लागेल तर कांहींचीं उत्पादन-लक्ष्यें थोडीं खालीं उतरवावीं लागतील. भांडवली गुंतवणीसाठीं निरनिराळ्या योजनांच्या महत्त्वानुसार त्यांची जी क्रमवारी ठरविण्यांत आली आहे त्यांतही कांहीं बदल करणें भाग पडणार आहे. कारण लष्करी खर्चाचा आणि दीर्घ मुदतीच्या गुंतवणींचा अवाढव्य व्याप कमी न केल्यास उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर त्याचा अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं.

मोठ्या प्रमाणावरील औद्योगिकरण–योजनांचा सामान्य मनुष्याच्या जीवनावर बराच ताण पडणार होता. तरीही त्याचें मन या योजनांना अनुकूल राहावें यासाठीं या योजनांतून त्वरित कांहीं फलप्राप्ति होत असल्याचें त्याला पटवून देणें अवश्य होतें. या आवश्यकतेमुळेंच अंकित प्रदेशांतील वास्तविक वेतनाच्या पातळींत थोडी फार तरी सुधारणा घडवून आणण्याच्या

कल्पनेस चालना मिळाली होती. ही कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं अन्नधान्यांचे व उपभोग्य वस्तूंचे सरकारी सांठे खुले करण्यांत येत होते; त्यांतच दोनतीन वर्षें त्या देशांत पिकपाणीही बरें आलें होतें. त्यामुळें अंकित प्रदेशांत सर्वत्र आबादीआबाद आहे असा सर्वांचा ग्रह होण्यास मदत झाली.

परंतु या नवीन मार्गाचें खरोखरच कांही नाविन्यपूर्ण वैशिष्टच होतें काय? हा नवीन मार्ग खरोखरच कांहीं नवीन धोरणाचा निदर्शक होता काय? कां तत्त्व तेंच, केवळ तपशील तेवढा किंचित वेगळा; वृत्ति तीच, युक्ति तेवढी वेगळी, अशीच या बाबतची परिस्थिती होती? आणि जर हा मार्ग खरोखरच नवीन असेल तर त्याचें साध्य काय? शेतकरीवर्गाची स्थिती सुधारण्याचें सामर्थ्य त्यांत आहे काय? आणि अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न या मार्गानें यशस्वी रीतीनें सुटू शकेल काय? या आणि अशा सर्व प्रश्नांचीं उत्तरें स्पष्टपणें मिळणें अवश्य आहे असें पूर्वानुभवावरून म्हणावें लागतें.

उत्पादनसामुग्रीचें मूलग्राही फेरवांटप अगदीं थोड्या अवधींत जवळ जवळ अशक्यच असतें. कारण एकादा मोठा व्यवसाय एकदम बंद करावयाचा म्हटलें किंवा त्याच्या उत्पादनाचे प्रमाणांत कपात करावयाची म्हटलें तरी त्यामुळें त्या व्यवसायांत वापरांत असलेली बरीचशी यंत्रसामुग्री वायां जाते. प्रादेशिक स्वयंपूर्णतेच्या तत्त्वावर अधिष्ठित असलेल्या उत्पादनपद्धतींत असे बदल दीर्घ कालावधींत घडवून आणणेंही कठीण असतें.

परंतु हे बाजूचे विचार सोडून आपल्याला मूळ विषयाकडे वळलें पाहिजे. इ. स. १९४९ पर्यंत सोव्हिएट संघराज्यापेक्षां अंकित प्रदेशांत श्रमशक्तिसाठीं अधिक किंमत द्यावी लागत असे. आजची परिस्थिती त्याच्या उलट आहे. त्यामुळेंच स्वदेशी उत्पादनापेक्षां अंकित प्रदेशांतील उत्पादन सोव्हिएटला आज आर्थिकदृष्ट्या हितावह ठरत आहे.

अंकित प्रदेशांच्या आर्थिक शोषणाचा गाभा येथेंच आहे. सोव्हिएट योजनाकारांनीं अंकित प्रदेशांना महत्त्वाच्या उपभोग्य वस्तूंसाठीं सोव्हिएटवर अवलंबून राहाण्यास भाग पाडलें आहे. त्या वस्तूंचे मोबदल्यांत अंकित प्रदेशांतून वाढत्या प्रमाणांत तांत्रिक सामुग्रीचा ओघ रशियाकडे वळविणें

अनुक्रम २८५५८ दि: निबंध
क्रमांक ११६२ नों दि: १२-२-५८

त्यांना शक्य होत आहे. त्याचबरोबर तेथें स्वस्त श्रमांची बाजारपेठही रशियाला कायमची उपलब्ध झाली आहे.

युद्धोत्तर कालाच्या प्रारंभीं अंकित प्रदेशांची लूटमार करण्याचे जे मार्ग रशियानें अवलंबिले होते, त्यापेक्षां त्याचे आजचे मार्ग अधिक हुषारीचे आणि प्रभावी ठरणारे आहेत, हें मुद्दाम स्पष्ट करण्याची जरूर नाहीं. आपल्या पूर्वीच्या राक्षसी साधनांत रशियानें योग्य वेळीं इष्ट बदल केला नसता तर अंकित प्रदेशांच्या सुप्त उत्पादनशक्तींचा आज जो लाभ त्याला होत आहे, तो त्याला कधींच होऊं शकला नसता.

### भूतकालाशीं साधर्म्य

अंकित प्रदेशांच्या आर्थिक शोषणाचें नाझी जर्मनीचें तंत्र आणि सोव्हिएट रशियाचें तंत्र यांत बरेंच साधर्म्य आढळतें. अंकित प्रदेशांच्या आर्थिक विकासांतून जर्मनीचाच स्वार्थ साधण्याचा नाझी नत्यांचा मानस असे. परंतु जर्मनीच्या राजकीय प्रभुत्वाला कांहीं मर्यादा असल्यामुळ त्यांना आपला हेतु साध्य करण्यासाठीं व्यापारी मिषानें इतर देशांत प्रवेश करून घेणें भाग पडत असे. सवलतीच्या दरांचें आमिष दाखवूनच जर्मनीनें मध्य व पूर्व युरोपांतील कित्येक राष्ट्रें आपल्या आर्थिक प्रभुत्वाच्या कक्षेंत आणलीं होतीं.

कम्युनिस्ट रशिया आणि फॅसिस्ट जर्मनी यांच्या पिळवणुकीचे पद्धतींत दोन प्रमुख भेदही आहेत. दुसऱ्या देशांना लुबाडून आपली तुंबडी भरण्याचे जर्मनीचे व्यवहार उघड आणि रोखठोख स्वरूपाचे असत. जर्मनीला आपली निर्यात वाढविण्याची फारशी शक्यता नसे आणि इच्छाही नसे. त्यामुळें आयात-निर्यात व्यापारांत अंकित प्रदेशांचे नांवावर जर्मनीच्या देण्याच्या मोठमोठ्या रकमा नेहमींच बाकी असत.

दुसरी गोष्ट म्हणजे पूर्व युरोपांतील देशांचा जर्मन कक्षेंत समावेश झाल्यामुळें त्या देशांतील प्राथमिक स्वरूपाच्या उत्पादनाचाच तेवढा विकास झाला. जर्मन उद्योगधंद्यांना शेतकी व खनिज स्वरूपाचा कच्चा माल पुरविणारे विभाग एवढेंच स्थान अंकित प्रदेशांना दिलें गेलें होतें. युद्धजन्य परिस्थितीची झळ लागून जर्मन उद्योगधंद्यांवर विलक्षण ताण पडूं लागेपर्यंत या प्रदेशांच्या औद्योगिकरणाची कल्पनाही जर्मन नेत्यांचे मनास शिवली

नव्हती. (अंकित प्रदेशांत संयुक्त मालकीच्या कंपन्या स्थापन करण्याच्या नाझी पद्धतीचेंच पुढें सोव्हिएट रशियानें अनुकरण केलें आहे.)

जर्मनीचे हेतु त्या त्या देशांच्या राष्ट्रीय आकांक्षांचे नेमके विरुद्ध असत. एकट्या झेकोस्लोव्हाकियाचा अपवाद सोडल्यास नाझी अंमलाखालीं पूर्व युरोपांतील सर्व देशांत शेतीवर उपजिविका करणाऱ्यांची संख्या इतकी वाढली कीं, उपलब्ध शेतजमिनीस तो भार असह्य होऊं लागला. त्यामुळें त्या भागांतील सुशिक्षित वर्गाची अशी दृढ धारणा झाली आहे कीं, यापुढें शेतीकडून कारखान्यांकडे मनुष्यबळाचा ओघ वळविला गेला नाहीं तर आपल्या देशाची आर्थिक वाढ खुंटल्याशिवाय राहाणार नाहीं; शेती व्यवसायांतील अर्धबेकारांना नवीन उद्योगधंद्यांत काम दिल्यानें देशांतील रोजंदारीचें दुष्ट चक्र नष्ट होईल; भांडवलसंचयाची पातळी वर जाईल; शेती-व्यवसायांत अधिक कसोशीनें काम केलें जाईल. आणि त्यामुळें सर्व क्षेत्रांत उत्पादनाची योग्य वाढ होऊन अर्थव्यवस्थेचें डळमळीत आसन स्थिरावेल असा त्यांचा विश्वास होता. दोन महायुद्धांचे दरम्यानचे काळांत तयार वस्तूंच्या किंमतींत शेतमालाच्या किंमतीचे मानानें अधिक अनुकूल बदल होत गेले होते. या वस्तुस्थितीमुळें वरील विचारास विशेष पुष्टी मिळाली. इ.स.१९३० पासूनच्या दहा वर्षांत पोलंड वगैरे देशांतील परकीय भांडवलाचा ओघ आकस्मिक आटून गेला होता. त्यामुळें वाटेल तो त्याग करावा लागला तरी आपल्या देशाच्या आर्थिक विकासास लागणारा पैसा आपणच उभा केला पाहिजे, अशा विचारांचे वारे त्या भागांत सर्वत्र वाहूं लागले होते. आर्थिक व राजकीय स्थैर्य आणि सत्ता यांचें मोजमाप देशांतील लोखंड-पोलादाच्या व यंत्रोत्पादनाच्या व्यवसायाचे स्थितीवरूनच होत असतें, ही कल्पना सुशिक्षित वर्गाचे मनांत खोलवर रुजून बसली होती.

सोव्हिएट रशियानें औद्योगिकरणाचें धोरण आंखून या राष्ट्रीय मनोवृत्तीचा पुरेपूर फायदा घेतला आहे. या धोरणाबरोबरच अंकित प्रदेशांची सांखळी जोडून देतांना, काळ्या समुद्रापासून बाल्टिक समुद्रापर्यंतच्या देशांत परस्पर-सहकार्य घडवून आणण्यासाठीं आपण केवळ मध्यस्थ म्हणून काम करीत आहोंत असा निःपक्षपातीपणाचा आव रशियानें आणला आहे.

युरोपांतील राष्ट्रीय आकांक्षांचा कैवारी म्हणून सोव्हिएट रशिया नेहमीं कां उभा असतो, हें अद्याप कित्येकांना गूढच आहे.

◆◆ ◆◆ ◆◆

स्वतंत्र राज्य म्हणून पोलंडचें अस्तित्व टिकवून धरण्यासंबंधीं जीं आंतरराष्ट्रीय आश्वासनें रशियानें इ. सन. १८१५ मध्यें दिलीं होतीं तीं मोडण्यास रशिया जेव्हां उद्युक्त झाला, त्यापूर्वी जवळ जवळ शंभर वर्षांपासून पोलंडचे आर्थिक हितसंबंध रशियाशीं जोडून टाकण्याचें कार्य चालू होतें. रशियाच्या वाढत्या राजकीय वर्चस्वाचा फायदा पोलंडचें आर्थिक कल्याण साधण्यासाठीं करून घेण्याची कल्पना दूरदर्शी पोलिश मुत्सद्यांचे मनांत (विशेषेंकरून इ. स. १८२१ ते १८३०चे कालांतील चाणाक्ष पोलिश अर्थमंत्रि प्रिन्स ड्रूकी लूबेकी याचें मनांत) रुजूं लागली होती. या कल्पनेस मूर्त स्वरूप म्हणून पोलंडमध्यें रशियाचे मदतीनें हळूंहळू निरनिराळीं औद्योगिक केंद्रें निर्माण होऊं लागलीं होती. लोड्झ येथील कापडउत्पादन-केंद्र हें त्यापैकींच एक होय. या केंद्रांमुळें पोलंडमधील कारखान्यांना रशियाची भली थोरली बाजारपेठ खुली होऊन पोलंडचा फार मोठा लाभ झाला होता. अगदीं थोडया अवधींत पोलिश उद्योग-धंद्यांची वाढ होऊन त्यांना उर्जितावस्था प्राप्त झाली होती.

सोव्हिएट संपर्कामुळें संबंधित लहान देशांचा फार मोठा फायदा होतो, त्यांना सोव्हिएटच्या अमाप साधनसामुग्रीचा आणि किंमतीच्या चढउतारांपासून मुक्त असलेल्या सोव्हिएटच्या विस्तीर्ण बाजारपेठांचा लाभ झाल्यावांचून राहात नाहीं, हा जुना दावा युद्धोत्तर कालांत सोव्हिएटच्या आर्थिक साम्राज्यांत पुन्हां नव्यानें मांडला जात आहे. आर्थिक विषयांवर सोव्हिएट रशियांत आज जें लिखाण प्रसिद्ध होत आहे, त्यांत या विचारसरणीचें पुनरुज्जीवन होत असल्याचें जागोजागीं दृष्टोत्पत्तीस येतें. कित्येक नामांकित विचारवंतांचाही प्रथमदर्शनीं या युक्तिवादावर विश्वास बसल्यास त्यांत कांहीं नवल वाटण्याजोगें नाहीं. उदाहरणार्थ--डॉक्टर ह्यूबर्ट रीप्कासारख्या माजी झेक व्यापारमंत्र्यानें केलेल्या विधानाच्या सत्यतेबद्दल किंवा विधानकर्त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल सामान्यपणें कोणीही शंका घेणार नाहीं.

इ. स. १९४६ मध्यें या हुषार मंत्रिमहाशयानें असा विश्वास प्रकट केला होता कीं "झेकमधील अवजड उद्योगधंद्यांच्या उत्पादनास रशिया आणि मध्य युरोपही उत्तम बाजारपेठ आहे. या वस्तूंच्या निर्मितीसाठीं खर्च होणाऱ्या मनुष्यबळाचे प्रमाणांत त्यांची विक्रीची किंमत राहाणार आणि अशी किंमत देऊन 'झेक' माल मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचें सामर्थ्य सोव्हिएट संघराज्याजवळ आहे." डॉक्टर ह्यूबर्ट यांच्या वरील विधानाची यथार्थता युद्धोत्तरकालांत झेकबाबत रशियानें घेतलेल्या राजकीय भूमिकेमुळें नष्ट होण्याजोगी नाहीं. मात्र युद्धोत्तरकालांत झेकोस्लोव्हाकियांत घडून आलेला महत्त्वाचा बदल म्हणजे तेथील बाजार-यंत्रणेची जागा आतां केंद्रीय नियंत्रणानें घेतली आहे. त्यामुळें वस्तूंच्या किंमतींचें कार्य पूर्वीपेक्षां पार बदलून गेलें आहे. सोव्हिएटला हितावह आणि अंकित प्रदेशांना घातक असें राष्ट्रीय उत्पन्नाचें फेरवांटप करण्याचे कार्यास आज त्या हातभार लावीत आहेत.

औद्योगिकरण आणि शेजारी राष्ट्रांचें आर्थिक एकीकरण हे पिळवणुकीचे दोन नवे मार्ग समुदायवादी केंद्र-नियंत्रित व्यवस्थेंतून उगम पावले आहेत.

REFBK-0009286

## कथा वैभव

प्रसिद्ध मराठीं कथालेखकांनीं स्वत: निवडलेल्या उत्कृष्ट कथांचा अपूर्व प्रातिनिधिक संग्रह

**य. गो. जोशी ते गो. नी. दांडेकर**

**अठरा कथा : रु. ५–००**

✦

## कुमार साहित्य माला

कुमारांसाठीं निवडक साहित्य

**१. हद्दपार :** श्री. ना. पेंडसे
सामाजिक कादंबरी : रु. १–५०

**२. हेन्री फोर्ड :** अनु. अमरेन्द्र
स्फूर्तिप्रद चरित्र : रु. २–००

**३. ओंजळ :** वामन चोरघडे
संस्कारी कथासंग्रह : रु. १–७५

**४. कोनटिकी :** अनु. श्रीकान्त राय
साहसी प्रवासवृत्त : रु. २–००

**५. राखेंतील निखारे :** अनु. देसाई
१८५७ ची एक कथा : रु. १–७५

✦

अगदीं लहान मुलांसाठीं सचित्र पुस्तकें

**मन्या :**
चिमुकल्या मांजराची गोष्ट : १ रु.

**पपू :**
चिमुकल्या चित्त्याची गोष्ट : १ रु.

# नवीं प्रकाशनें

**कथासरित्सागर : १० पुस्तकें**

संस्कृत कथासरित्सागरांतील दहा अद्‌भुतरम्य दीर्घकथा

**अनुवादक : प्र. शं. जोशी**

**प्रत्येक पुस्तक : ४० नये पैसे**

**दहा पुस्तकांची संच-पेटी : ४ रु.**

✦

## लोकसेवक चरित्रमाला

**सहा चरित्रें : ले. अमरेन्द्र**

**१ ठक्करबाप्पा, २ डॉ. श्वाइत्झर**
**३ विनोबा, ४ गाडगे महाराज**
**५ फादर डेमियन, ६ रविशंकर**

विशेषत: अल्पशिक्षितांसाठीं सोप्या भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें

**प्रत्येक पुस्तक : ५० नये पैसे**

**सहा पुस्तकें : ३ रु.** (ट. ख. माफ)

✦

**तीन गोष्टी : अमरेन्द्र**

भारत सरकारपुरस्कृत 'तीन कहानियाँ'चें रूपान्तर : ६२ न. पै.

## वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड

३, राऊंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

# कथासरित्सागर

कथासरित्सागर या सुप्रसिद्ध संस्कृत ग्रंथांतील
निवडक दहा अद्भुतरम्य कथा

✦

अनुवादक : प्र. शं. जोशी

✦

दहा मराठी पुस्तकें

संच-पेटी : ४ रुपये

१. महामति वररुचि
२. महाकवि गुणाढ्य
३. साहसी श्रीदत्त
४. पराक्रमी विदूषक
५. वत्सराज उदयन
६. यक्षराज शक्तिदेव
७. स्वाभिमानी गुणशर्मा
८. शापभ्रष्ट श्रीदर्शन
९. बाहुशाली भीमभट
१०. सम्राट विक्रमादित्य

प्रत्येक पुस्तक ४० नये पैसे : संच-पेटी ४ रुपये

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

वोरा अॅन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राऊंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.